|| श्री ||

# "CLASSMATES"

DIALOUEGS 6.0

KSHITIJ PATWARDHAN

## 1.Ext-int/ college corridor-music room/ day

संध्याकाळच्या वेळेस पुण्यातलं एक कॉलेज दिसतं. जुनं स्ट्रक्चर, दगडी भिंतीं, मधोमध हिरवळ त्यात झाडं, पुढे कॉलेजचा बोर्ड दिसतो. त्याच्या शेजारुन एक टेम्पो आत येतो. टेम्पोतून फ्लेक्स काढला जातो. दोन म्हातारे प्यून्स बन्याबापू पांढरा फ्लेक्स घेऊन आत कॉरीडॉर मध्ये जातात. बाहेर फळयावर रंगीत खडूनी "अनिरुध्द इनामदार मेमोरियल म्युझिकसेक्शन उदघाटन" अस लिहीलंय तिथून दोघं आत जातात. नुकत्याच रंगवलेल्या, सजवलेल्या रुममध्ये फ्लेक्स आणून उभा करतात. तो उलटा करतात. समोर अनिरुध्दचा फोटो दिसतो त्याखाली अनिरुध्द इनामदार १९७६ ते १९९५ असं लिहीलेलं. समोर प्रिन्सिपल रुक्मीणी इनामदार दिसतात, त्या बोर्ड खाली एक खूप जुनी, रंग गेलेली गिटार ठेवतात. हलकेच हसतात. मागे वळून म्युझिक सेक्शनकडे पहातात. म्युझिक सेक्शन दिसतं. एका बाजूला तीन तबले, दोन पेटया, दुसऱ्या बाजूला ड्रम सेट, कोंगो, बोंगो, दोन गिटार, सतार असं नीट मांडून ठेवलेलं. भिंतीवर आर्टीस्टिक डिझाईन्स आणि त्यात गायक, संगीतकारांची पोस्टर्स लावलेली. मॅडम सगळयाकडे समाधानाने पहातानाच त्यांचा फोन वाजतो. त्या बोलत बोलत पुढे चालत येतात.

*मॅडमः हो हो, आम्ही फक्त त्याच्या जवळच्या आणि ओळखीच्या लोकांनाच बोलवलंय. बाकी नाही. हो जवळची म्हणजे तीच सत्याची बॅच. नाही, तो ज्युनिअर होता त्यांना, हां! पण तेच त्याचे क्लासमेटस असल्यासारखे होते. खरंय. प्रत्येक कॉलेजमध्ये अशी एक बॅच असतेच जिच्यासारखं आधीही कुणी नसतं, आणि नंतरही येत नाही.*

बन्या बापू आता दारावर रिबीन लावतात.

*बन्याः बन्या, ही डेडली बॅच गेली, आपण तर झोपलोच नाही दोन दिवस.*

*मुलगाः एवढी अटॅचमेंट?*

*बापूः घंटयाची अटॅचमेंट. जाताना हॉस्टेलच्या गादया पळवून घ्यून गेले होते भुरटे काय बापू?*

रिबीन लावली जाते.

1A. Ext/ college corridor/ day

कॉलेजच्या सजवलेल्या आवारात आता डस्टर गाडी येते. कॉरीडॉर पाशी थांबते. त्यातून पस्तीशीची छान एथनिक साडी नेसलेली अप्पू आणि स्मार्ट जॅकेट घातलेला अमित उतरतात. मॅडम तिच्या दिशेनी जातात. नोटीस बोर्डच्या पुढे दोघी मिठी मारतात.

*मॅडमः या या या... अपर्णा! केवढी बदललीयेस अगं.*

*अप्पूः मॅडम आज तरी अप्पू म्हणा.*

*मॅडमः आता एवढया मोठया एन जी ओ च्या संचालिकेला असं म्हणण बरं नाही दिसत. काय अमित?*

*अमितः अनिरुध्द असता तर हिला म्हणला असता, ओ मॅडम जरा अप्पूला पाठवा.*

तिघे हसतात. आतून एक माणूस आणि बाई येताना दिसतात.

*अमितः अरे हा घटट आहे!! बाप रे!!*

घटट आणि त्याची बायको येतात. घटट अमित आणि अप्पूला मिठी मारतो.

*अमितः तू आहे तसाच आहेस रे घटट.*

*घटटः (हळूच) भाडया, बायकोसमोर तरी विदयाधर म्हण.*

*मॅडमः (आश्चर्याने) तुझं खरं नाव विदयाधर आहे? मला आज कळलं घटट.*

सगळे हसतात.

*घटटः ओ सॉरी...बाय द वे ही जसपिंदर.*

*जसपिंदरः हॅलो ऑल. (त्याच्याकडे पहात) ओजी घाटट का मतलब क्या है?*

घटट वैतागून पहातो.

*अमितः मॅडम आम्ही जरा हॉस्टेलला जाऊन येऊ का?*

*मॅडमः फक्त पटकन या परत प्लीज.*

*अमितः चला.*

चौघे वळतात. त्यांच्या मागे रिबीन लावलेल्या डाव्या बाजूला एक माणूस टेबलवर एक बॉक्स घेऊन येतो. उघडतो. एकामागून एक बाटल्या काढून टेबलवर ठेवल्या जातात. शेवटी एक क्वार्टर निघते. तो ती आत टाकतो. फोन काढतो.

*टाकेशः हां नारंगी. टाकेश हिअर. आज रात्री आपण प्यायला घरी नाही हां. एवढं प्रेमानं बोललो ना, काय हाय का नाय मंग?*

1B. Ext/ somewhere near the room / day

मुलींचा घोळका दिसतो. मॅडम त्या मुलींच्या घोळक्यात येतात.

मॅडमः कशा आहात सगळया?

प्रमिलाः मस्त.

कोपऱ्यात एकटी मुलगी रुबाया घालून ऑकवर्ड उभी दिसते. मॅडम तिकडे पहातात. तिच्या जवळ जातात.

*मॅडमः (तिला निरखत) हीना ना तू? मग अशी लांब का उभी आहेस?*

*हिनाः नाही नाही सहजच. जस्ट आले.*

*मॅडमः काय करतेस आता?*

*हिनाः औरंगाबाद ला असते टीचर आहे.*

.

2. Int/ toilet / day

टॉयलेटचा बोर्ड दिसतो. अमित आणि घटट उभे आहेत.

*अमितः (नाटकीपणे) महान अभिनेते समीर साने उर्फ ससा कसे नाही आले अजून?*

*घटटः ते आतमध्ये मुकुट घालून डबा टाकत असावेत महाराज.*

दोघं हसतात. शेजारनं शुक शुक ऐकू येतं. दोघं दचकतात. समोर ससा उभा आहे.

*ससाः बाहेर ये तुला दाखवतो.*

*घटटः महान अभिनेते समीर साने?? सर झालं की हात धुवून ऑटोग्राफ दया.*

ससा हसतो. ऑटोमॅटिक पाण्याचा आवाज येतो.

*ससाः अरे अरे, पाणी वगैरे यायला लागलं रे हॉस्टेलच्या टॉयलेट ला, मजाच गेली सगळी.*

तिघे हसतात.

## 2A. Ext/ College stairs / day

जिन्यातनं सगळे चालत खाली येतायत.

*ससाः (जसपिंदरला) इसको कॉलेजमे एकभी कपडा नही आता था, सब टाईट. टी शर्ट पहना तो ब्लाऊज लगता था. इसलीये घटट बोलते थे.*

*अमितः आपको फोटो देखना है? (पाकीटातनं एक फोटो काढतो. फोटो दिसतो.)*

*ससाः किती वर्ष झाली यार! मध्ये चार वर्ल्ड कप, तीन निवडणुका, सगळयांची लग्न, तरी घटट आजिबात पातळ झाला नाहीये.*

सगळे हसतात. अप्पू त्याला फटका मारते.

*जसपिंदरः आप तो टेडी बेअर लग रहे हो! अच्छा ये पीछे कौन है?*

*अप्पूः तो? रोहीत भोसले. आता आमदार रोहीत भोसले.*

## 3. Ext/ college corridor / day

गेटमधून लाल दिव्याच्या पांढऱ्या करकरीत गाडीतून रोहीत येताना दिसतो. शांत करारी स्वतःच्याच विचारात. पुढे पीए मनोज जाजू. गाडी थांबते. गाडीतून उतरतात. समोर दहा पंधरा जण जमलेले. रोहीत आणि मनोज चालत येतात. समोर दोन तीन सर उभे आहेत.

*एम जेः नमस्कार सर, कसे आहात? आणि तुमचा सेक्सपिअर कसा आहे?*

*सेक्सपिअरः बराय बराय. अरे तू कधीतरी सोडून राहा बरं याला.*

*रोहीतः सर मनोज आता पी ए आहे माझा.*

समोरुन मॅडम येताना दिसतात. त्यांच्याकडे जातो. मॅडम आणि हॉस्टेलची सगळी गँग आता एकत्र बाहेर आलीये. रोहीत मॅडम समोर उभा आहे.

*मॅडमः मी म्हणलं मलाही येतोय, फोन साहेबांना जमत नाहीये.*

*रोहीतः शक्य आहे का मॅडम? जुनी काम पेंडींग होती. संपवली आणि आलो.*

नमस्कार करतो. समोर हॉस्टेलची गँग उभी आहे. रोहीत त्यांच्याकडे पहातो.

*रोहीतः (त्यांच्याकडे पहात) सत्या नाही आला?*

*मॅडमः नाही. ये ना.*

तो हॉस्टेलच्या गँग कडे पहातोच आहे. मॅडम त्याला दुसरीकडे घेऊन जातात.

3A. Ext/ college corridor / day

इथे गँग आणि आजूबाजूला तीन चार जण उभे आहेत.

*ससाः सध्या दोन सिरीयल्स चालू आहेत आणि एक फिल्म.*

*अप्पूः आणि खरं?*

सगळे हसतात. अप्पू डोळा मारते. त्याच्याच शेजारी उभ्या असलेल्या प्रताप कडे पहाते.

*अप्पूः (आठवत) तू प्रताप ना रे? एनसीसी?*

*प्रतापः हो.*

*अप्पूः मग आता काय करतोस?*

तेवढयात एक ब्लॅक कलरची स्कोडा त्यांच्या पुढयात येऊन थांबते. प्रश्न तसाच रहातो. प्रतापही तिकडे पहातो. सगळी लोक गाडीकडे पहातायत. गाडी थांबते आणि दार उघडून उर्वशी बाहेर येते. थोडी प्रौढ, शांत पण सुंदर, किंचीत ऑकवर्ड झालेली. हातात पर्स, त्याला छोटे घुंगरु. अप्पू तिच्याकडे पहात रहाते. उर्वशी हॉस्टेल गँगकडे पहाते. चेहऱ्यावर ऑकवर्डनेस दिसतो. रोहीत जवळच उभा आहे.

*उर्वशीः (त्याला पाहून) हाय. कसा आहेस?*

*रोहीतः गुड. मला वाटलं तू नाही येणार बहुतेक.*

*उर्वशीः (सूचक) आजचा चान्स घालवायचा नव्हता. (त्याच्याकडे पाहून फॉर्मली हसते.)*

उर्वशी तशीच चालत येऊन मॅडमना नमस्कार करते. समोर हिना येते. दोघी मिठी मारतात.

*उर्वशीः सॉरी. परवा नेमकं अरंगेत्रम आहे स्टुडंटसचं. म्हणून वेळ लागला.*

*मॅडमः ठीक आहे गं! चला, फंक्शनला सुरुवात करुया.*

अप्पू तिच्याकडे पहातेच आहे. एवढयात तिला फोन येतो. ती ग्रुप मधनं बाजूला होते. सगळे फंक्शनच्या दिशेनी निघायला लागतात.

*अप्पूः आलेच! (फोनवर) हां. हो बोलतेय. काय? परत? बरं आम्ही येतो थोडयावेळात. नाही नाही आधी तिला शांत करा मग सासरकडच्यांच बघू आपण. आम्ही येतो थोडयावेळात.*

वळते. कॉरीडॉरच्या बाहेर फंक्शन सुरु झालेलं दिसतं.

4. Ext/ passage in front of music room / day

सगळे घोळका करुन उभे आहेत. रिबीन कापली जाते. रोहीत ती कापतो. फोटो काढले जातात. सगळे टाळया वाजवतात. अप्पू मागून येते आणि त्यांच्यात थांबते.

*रुक्मीणीः मी फार काही बोलणार नाही. (माईकवर) अनिरुध्द अचानक गेल्यावर मी आई म्हणून कसं जगायचं मोठा प्रश्न होता. पण जाताना त्याचंही उत्तर देऊन गेला तो. हे म्युझिक सेक्शन त्याचं स्वप्न होतं, मग ते माझं झालं. माझ्यापरीनं करायचा प्रयत्न केलाय. (गहिवरते.) यात आपलाच एक्स स्टुडंट आमदार रोहीत भोसलेनी मोठी मदत केलीये. मी त्याला रिक्वेस्ट करते की मी खूप इमोशनल होऊन रडण्याआधी त्यानी दोन शब्द बोलावेत.*

टाळया वाजतात. रोहीत माईक समोर येतो. अप्पू तो समोर आलेला पाहून दुसरीकडे पहाते. तिला मागे एका मुलाच्या मागे अर्धवट सत्या उभा दिसतो. ती खुणेनीच अमितला दाखवते. पण तिथे कोणीच नाही. ती चक्रावते.

5. Int/ Music Room/ day

म्युझिक सेक्शनमध्ये अनिरुध्दच्या फोटोसमोर पाठमोरा एक माणूस उभा आहे. जुने कपडे, अडकवलेली शबनम आणि पोश्चर मध्ये दबलेपण. तो समोरनं गिटार उचलतो. हातात घेतो. त्याकडे पहातो. प्रौढ, निस्तेज सत्या दिसतो. गिटारच्या जुन्या लाकडी फिक्या भागावरनं हात फिरवतो. गिटार स्ट्रम करतो. हसून वर पहातो.

**FLASHBACK**

तेच म्युझिक सेक्शन पूर्ण बदललेलं. आजूबाजूला युवाशक्तीची पोस्टर्स बॅनर्स, ग्रॅफीटी लागलीयेत. लख्ख दुपार आहे. समोर वीशीचा अनिरुध्द घाबरुन उभा आहे.

*अनिरुध्दः तुम्ही काहीही रॅगिंग घ्या पण तारामतीला हात लावू नका.*

*सत्याः (आश्चर्यानी) कोणाला?*

अनिरुध्द गिटार कडे बोट दाखवतो.

*सत्याः तुझ्या तारामतीला बारामतीलाच पाठवतो थांब. (अंगावर जात) तुला काय वाटलं हे रॅगिंग आहे?*

*अनिरुध्दः अहो, कॉलेज जस्ट सुरु झालंय. मी वाजवताना तुम्ही मध्ये घुसलात, रॅगिंग नाहीतर काय गॅदरिंग असणार का हे?*

*सत्याः एफ वाय का?*

*अनिरुध्दः (हसू येत) नाही पाचवीला. आत्ता सुटटीत टॉन्सिल्सच ऑपरेशन झालं.* (हसायला लागतो.) *चांगला होता ना?* (चुकून खांदयावर हात ठेवतो. सत्या त्याच्याकडे खोटया खुन्नसने पहात हात तसाच धरतो.)

*सत्याः विचार केला का हात ठेवायच्या आधी?*

*अनिरुध्दः मी विचार करुन काहीच करत नाही. मस्करी पण आणि मैत्री पण. तरी राग आला असेल तर मग ठीके, ज्याला आला राग...*

*सत्याः (चिडून) त्याला काय?*

*अनिरुध्दः काही नाही. असचं.*

*सत्याः (हात पिरगाळतो) बोल ना...  ज्याला आला राग? (अजून पिरगाळतो.)*

*अनिरुध्दः नको ना...* (एक क्षण पूर्ण शांतता, टेन्स)

*सत्याः (जोरात) बोल! ज्याला आला राग...*

*अनिरुध्दः ...त्याची माफी माग! पॉपिन्स पाहीजे?*

*सत्याः (हसू येतं) काय?*

*अनिरुध्दः पॉपिन्स. (त्याला देतो.)*

*सत्याः थोडयावेळानं बोरकुटही काढशील.*

*अनिरुध्दः आहे खरचं! देऊ का?* (सत्या हसायला लागतो. बॅगेत हात घालतो.) बॉबीच पाकीट पण होतं पण संपलं. *(सत्या जोरजोरात हसतोय.)*

*अनिरुध्दः आणि तारामतीला हात लावायचाय तर नीट लावा. करंगळी वर धरा, पहीलं बोट, तिसऱ्या बार वर ,आणि मधली दोन इथं (त्याला समजावतो.) वाजवा ना, (सत्या गिटार हातात धरतो.)*

*सत्याः नाव काय तुझं?*

*अनिरुध्दः (हात पुढे करत) अनिरुध्द.*

*सत्याः आणि ज्याला आला रागच्या पुढं काये खरंच?*

अनिरुध्द त्याच्याकडे बघून दिलखुलास हसतो.

**FLASHBACK ENDS**

5A. Int/ Music Room/ evening

आत्ताचा सत्या हलकेच हसतो. एवढयात त्याला पाठीवर जोरात कोणीतरी मारतं. सत्या मागे वळून पहातो. अप्पू आणि अमित उभे आहेत. तिघे एकमेकांकडे पहातायत. अमित त्याला कडकडून मिठी मारतो.

*अमितः सत्या? अरे, कसा आहेस तू? किती वर्षांनंतर!!!*

मिठी सोडवतो. अप्पू त्याच्याकडे निरखून पहातेच आहे. त्याच्या जवळ जाते.

*अप्पूः (त्याच्याकडे निरखून पहात) हा दिवस लिहीला होता नशीबात, तुला परत भेटायला!! मी तुला म्हणलं ना अमित, सत्या आलाय आणि मला कळलं नाही असं होऊच शकत नाही. (त्याच्या डोळयात डोळे घालून) भेटणार नाहीयेस का मला नीट?*

सत्या तिला शेक हँड करतो. ती ही आश्चर्याने शेकहँड करते.

*सत्याः मी म्हणलं, चक्कर मारावी. सगळे भेटतील.*

*अप्पूः (फक्त पहातेय) चल तू.*

सत्या तारामती तिथेच ठेवतो. तिघे अनिरुध्दच्या फोटोसमोरुन बाहेर येतात. मंद म्युझिक ऐकू येतं.

6. Int/ Dinner hall/ evening

सजवलेला जेवायचा हॉल दिसतो. पस्तीस चाळीस उभे आणि बसलेले. एका कोपऱ्यात बुफे मांडलेला. काही लाईटच्या माळा सोडल्यात. एक दोन मुलं आग्रह करुन आधी बन्या बापूला खायला देतायत. रोहीत उर्वशी हिना एकत्र आहेत. वेगवेगळया ग्रुप मध्ये लोकं उभी आहेत. तेवढयात सत्या आणि बाकीची गँग आत येतात. रोहीत आणि उर्वशी सत्याकडे पहात रहातात. सत्या त्यांच्याकडे एक क्षण पहातो. मान खाली घालतो पुढे जातो. उर्वशी पुन्हा एकदा त्याच्याकडेच पहातेय. तिच्या नजरेतनं तिचा रोख जाणवतोय.

कोपऱ्यात टाकेश आणि एम जे उभे आहेत.

*टाकेशः मणोज जाजू? एम जे! तू विविध आवाजं काढायचा ना कॉलेजला? संजू कुमार, प्राण? राजकुपर! बेस्ट! सगळे सारखेच वाटायचे एकदम. (एम जे हसतो.) ओळखलं का नाय? (दोघं टाळी देतात.) मग? काय हाय का नाय?*

6A. Int/ dinner hall/ evening

ससाबरोबर एक जण फोटो काढतो. तो शेवटी या गँग मध्ये येतो. सगळे सत्याशी बोलतायत.

*२ः मग तू आता युवाशक्तीचं काहीच करत नाही का?*

सत्या शांतपणे नकारार्थी मान डोलावतो. उर्वशी आणि रोहीतकडेच पहातोय. ती ही रोखून त्याच्याकडेच पहातेय.

*ससाः आम्हाला वाटलं (खांदयावर हात ठेवतो.) गोल्डस्पॉट गेलं, बनवडा गेला, कँटीन गेलं, मॉर्निंग शोज गेले, सायकली गेल्या, तसा सत्याही  गेला आमच्या आयुष्यातनं. कुठे आहेस कुठे तू?*

*सत्याः (शांतपणे) तू अजूनही तसाच आहे का रे?*

*१ः तसाच म्हणजे?*

*घटटः फिल्मी रे! अरे नाटकाची प्रॅक्टीस चालायची तेव्हा मुकुट घालून डबा टाकायला जायचा हा. (हसतो.) आणि राजा राजा घात झाला आठवतंय ना? एफ वायला सत्यानी ससाला सांगीतलं ऐतिहासिक नाटक आहे, शिपायाचा रोल आहे. एन्ट्री घेऊन म्हणायचं राजा राजा घात झाला... यानी दोन दिवस तयारी केली. आला हॉलवर बेअरिंग घेऊन, राजा राजा घात झाला... सत्या म्हणाला हा घ्या भाला आणि श्यूईक घाला.*

सगळे वेडयासारखे फुटतात. आजूबाजूची लोक पहायला लागतात.

6B. Int/ dinner hall/ evening

आता अप्पू सत्या आणि अमित कोपऱ्यात उभे आहेत.

*सत्याः मी निघतो.*

*अप्पूः (अमितला) सुरेखाच्या सासरच्यांनी परत त्रास दिलाय. ती ऑफीसवर गेली होती. तिच्यामागे ती पण लोक आलीयेत. आपण जाऊ, तिला घरी शिफ्ट करु आणि परत येऊ.*

सत्या तिच्याकडे पहातोच आहे. अप्पू पहाते.

*अप्पूः असा काय पहातोयस? मी एन जी ओ चालवते. डोमेस्टीक व्हायलेन्स अगेन्स्ट! (थांबून) खूप काय काय घडलंय मध्ये. तेच सगळं सांगायचंय. बोलायचंय तुझ्याशी. थांब आम्ही आलोच.*

*सत्याः नाही. मी निघतो.*

*अप्पूः एवढया वर्षांनी भेटल्यावर एवढयात सोडेन मी तुला?*

*अमितः मग तू थांब. किंवा त्याला घेऊन जाऊ.*

*अप्पूः नको. त्यालाही सगळयांना भेटू दे तोवर आपण दोघं जाऊन येऊ पटकन. चल.*

*सत्याः मी निघतो खरचं. मला जायचंय.*

*अप्पूः (थांबून शांतपणे.) सत्या, आजतरी नको जाऊस न सांगता. प्लीज. आम्ही आलोच जाऊन. आपण कटटयावर भेटू डायरेक्टली.*

दोघं निघून जातात. सत्या तिच्याकडे पहात रहातो.

### 6C. Int/ dinner hall/ evening

सत्या इकडे तिकडे पहात प्लेट उचलतो. एवढयात पाठीवर थाप पडते. वळून पहातो. रुक्मीणी मॅडम त्याच्या हाताला धरतात. त्याच्याकडे डोळे भरुन पहातात.

*सत्याः अरे मॅडम!! (प्लेट ठेवतो.)*

*मॅडमः (त्याला न्याहाळत) शेवटी मित्रासाठी एवढया वर्षांनी कॉलेजची पायरी चढलास ना?*

*सत्याः (सावरत) या मैत्रीचं ओझं फार मोठं आहे, आलो नसतो तर कधीच उतरलं नसतं. तारामतीलाही भेटलो. आहे तशी आहे तुमची सून. (मॅडम हसतात.)*

*मॅडमः तुम्हाला सगळयांना बघून वाटलं, अनि पण येईल आणि... (इमोशनल होते.)*

*सत्याः (हात धरतो.) इथं यायला तो इथन जायला तर पाहीजे ना अहो. तो अजूनही इथंच आहे. या कॉलेजच्या प्रत्येक भिंतीवर, पायरीवर, बाकावर, कटटयावर अनिरुध्दच आहे. पास आउट बाकीचे झाले, तो नाही. (बॅगेतनं डायरी काढतो. मधून तुटका प्लक्ट्रम काढतो.) तो माझ्याबरोबरच आहे अजूनही. आज आलो नसतो तर फार रुख रुख लागली असती. मॅडम आज ना, मी जगातला सगळयात खूश माणूस आहे. खूप बरं वाटलंय.*

*मॅडमः (त्याच्या गालावरन हात फिरवत) आहेस ना तू?मी आलेच. मग बोलू निवांत. तू खाऊन घे आधी.*

सत्या प्लेट घ्यायला जातो. समोर पहातो उर्वशी उभी आहे. त्याच्याकडे पुन्हा रोखून पहातेय.

### 7. Ext/ Amit Car / Night

अप्पू आणि अमित गाडीतून येतायत.

*अप्पूः मला नाही वाटत आज रात्रही पुरेल सत्याशी गप्पा मारायला.*

*अमितः मी टाकेश ला दोनशे रुपये दिलेत. तो म्हणला झालं की हॉस्टेलवर या एक रुम ठेवतो.*

*अप्पूः सत्या... बापरे... कुठनं सुरुवात करायची त्याच्याशी बोलायला!!*

गाडी टाकी जवळ वळते. गाडी टाकी खाली पार्क करणार एवढयात वरुन धाडकन एक माणूस गाडीच्या बॉनेटवर पडतो. काचेवर वरुन पडलेला सत्या दिसत रहातो. त्याचे डोळे फिरतात तो मान टाकतो. अमित आणि अप्पू प्रचंड भेदरुन समोर पहातात. दार उघडून बाहेर येतात. त्याला कवटाळतात. दोघांची जोरदार किंकाळी ऐकू येते. दोघं सत्याला हातात धरुन ओरडताना दिसतात.

8. Int/ Hospital ICU ward / Night

आयसीयु मध्ये सत्या ॲडमिट आहे. नळया आणि बँडेज लावलेलं. अप्पू आणि रुक्मीणी बाहेरुन घाबरुन पहातायत.

8. Int/ Hospital ICU ward / Night

डॉक्टरांच्या केबिनमध्ये अप्पू आणि मॅडम घाबरुन बसलेल्या. चाळीशीचे डॉक्टर त्यांना समजावून सांगतायत. मागून  प्रताप ज्याच्याशी अप्पू बोलली होती येऊन उभा रहातो.

*डॉक्टरः अशा ठिकाणी मार लागलाय की पेशंट कोमातही जाऊ शकतो. डेथ होऊ शकते. त्यामुळे शुध्दीवर येण फार महत्वाच आहे. पडताना हात मध्ये आल्यामुळे तो फ्रॅक्चर झालाय. दुसऱ्या खांदयालाही स्वेलिंग आहेच. तुम्ही पोलिसांना बोलवा आधी.*

*प्रतापः एक्सक्युज मी डॉक्टर, मी सिनीयर पी आय प्रताप डोणजे पाटील. नुकतचं इथं पोस्टींग झालंय.*

अप्पू चक्रावून पहाते.

*यू जस्ट मेक शुअर की हे आत्ता बाहेर कोणालाही कळणार नाही. कॉलजचं नाव खराब होता कामा नये. माझा ज्युनिअर पी आय फॉरमॅलिटीज पूर्ण करेल, प्लीज को ऑपरेट.*

*डॉक्टरः ओके.*

अप्पू आश्चर्याने पहाते.

*अप्पूः तू? तू इन्स्पेक्टर आहेस? बोलला नाहीस.*

*प्रतापः मघाशी सांगणार होतो. तेवढयात काहीतरी झालं. मॅडमना माहीतेय. एनी वे. मी हवालदार पाठवून सगळयांना थांबवून घेतलंय. अमितला पाठवून दिलंय हॉस्टेलला. सगळयांना मेस मध्ये राउंड अप व्हायला सांगितलंय. इथं काही लागलं तर डॉक्टर आपल्याला कळवतील.*

*रुक्मीणीः मी थांबते इथं त्याच्याबरोबर.*

*प्रतापः (त्यांच्याकडे पहातो. त्या खचल्यात. तो खाली बसतो मॅडमचा हात हातात घेतो.) मला माहीतेय तुम्ही त्याला सोडून येणार नाही. मी एक कॉन्स्टेबल देतो. राहू दे मदतीला. आम्ही जाऊन येतो. (हातावर हात ठेवत) सगळं नीट होईल मॅडम. डोन्ट वरी.*

8B. Int/ Hospital ICU ward / Night

दोघं लिफ्ट मध्ये आहेत.

*प्रतापः बरोब्बर आजच्याच रात्री सत्या कसा पडला टाकीवरनं?*

दार बंद होतं.

9. Int/ Hostel mess / Night

मेसचं दार उघडतं. रोहीत आत येतो. समोर पंधरा वीस जण जमलेले. प्रताप मधोमध उभा आहे. त्याच्या हातात एक चिठ्ठी. उर्वशी रोहीतकडे पहाते. घाबरलेली आहे.

*प्रतापः या सर. (डायरी वाचतो.) मी खूप आधीच मरायला पाहीजे होतं. माझ्यामुळे खूप जणांना त्रास झालाय. तो दयायचा माझा हेतू नव्हता. पण तो झाला. जे झालं त्याबददल मी स्वतःला कधीच माफ करणार नाही. जगून मला फायदा नाही आणि मेलो तर कोणाचाही तोटा नाही. मी मला संपवून घेतोय. याला मी आणि माझं नशीब सोडून कुणीच जबाबदार नाही. मी जातोय.*

सगळयांच्या रिॲक्शन्स जातात.

*डायरीत एक तुटका प्लक्ट्रम, दोन जुनी पिक्चर ची तिकीटं आणि काय काय लिहीलेलं.*

उर्वशी आणखी रडवेली होते. रोहीत तिला धीर देतो.

*रोहीतः (प्रतापला) तू चार्ज घेतलायस?*

*प्रतापः येस सर.*

*रोहीतः रोहीत म्हणलास तरी चालेल. काय झालंय नेमकं?*

*प्रतापः उडी मारुन जीव दयायचा प्रयत्न केलाय! त्यानी खाल्ल, मग तो त्याच्या रुममध्ये गेला, रुम नं २२१, शबनम ठेवली. मग तो टाकीवरुन थेट यांच्या गाडीवरच पडला. म्हणजे त्यानी उडी मारली. सुसाईड नोट आहे डायरीत लिहीलेली.*

*अप्पूः तो संध्याकाळी मॅडमना म्हणाला होता आज तो जगातला सगळयात खूश माणूस आहे. तो का उडी मारेल?*

*प्रतापः जीव दयायच्या आधीच कुणीच म्हणत नाही मी दुखात आहे. परफेक्ट मिसलीडींग टॅक्टीक!*

*रोहीतः सत्या आत्महत्या नाही करणार प्रताप.*

*प्रतापः एव्हीडन्स आहे सर. आणि आत्महत्या नसेल तर मग काय आहे? कसा पडला वरनं तो? म्हणजे पडला? का मग ढकललं कुणी?*

प्रताप हलके उर्वशी कडे पहातो. ती सुन्न आहे.

*घटटः कोणी का ढकलेलं सत्याला?*

*प्रतापः नाही ना? म्हणूनच म्हणलं ना आत्महत्येचा प्रयत्न आहे. क्लीअरकट.*

*रोहीतः प्रताप, मी सी पींना फोन करणार होतो पण मला वाटतं, आता ही गोष्ट या प्रिमाईसच्या बाहेर जाता कामा नये. सत्या शुध्दीवर येईपर्यंत आपण इथेच वाट पाहूया हवंतर. एव्हरीबडी प्लीज कॉऑपरेट विथ हिम.*

*प्रतापः थँक यू. प्लीज सत्या शुध्दीवर येईपर्यंत प्रिमाईस सोडून कोणीही जाऊ नका. तो शुध्दीवर आला की कळेलच, आणि समजा नाहीच आला, तरी मी शोधून काढीन. तेवढं देण लागतो मी त्याचं.*

रोहीत मान हलवतो. प्रताप प्रत्येकाकडे पहातो. अप्पू समोर दिसते.

*प्रतापः मला अप्पूशी जरा बोलायचंय. बाहेर येतेस?*

अप्पू आश्चर्याने वर पहाते.

9A. Ext/ College Corridor/ Night

अंधाऱ्या रात्री कॉरीडॉर मधनं अप्पू आणि प्रताप बाहेर चालत येताना दिसतात. दोघांच्या सावल्या लांब लांब गेलेल्या.

*प्रतापः कॉलेज मध्ये हवा करणाऱ्या पोरांना गेटबाहेरच जग एवढं फुसकं कसं करुन टाकतं कुणास ठाऊक?*

*अप्पूः (स्वतःत आहे) मला का बोलवलंस बाहेर?*

*प्रतापः त्याच्या मोबाईलमध्ये फक्त तुझा नंबर आहे.*

*अप्पूः (डोळयात पाणी आणून मान हलवत) तो वाचेल ना रे?*

*प्रतापः लेटस सी.*

*अप्पूः वाचला पाहीजे. आम्हाला एकदा तरी नीट बोलता आलं पाहीजे. भेटलोच नाही कित्ती वर्ष. वाटलं होत आज सगळं बोलून घेता येईल. त्याला सुनावता येईल की बाबा, दर दोन तीन वर्षांनी*

*वेगवेगळया नंबरवरनं रँडम फोन करुन कशी आहेस विचारण बंद कर. त्यापेक्षा भेट मला. बोल माझ्याशी. तुला काय प्रॉब्लेम आहे तो एकदा सांग. मला आज खरंच त्याची कॉलर पकडून सुनवायच होतं, की बघ स्वतःकडे काय केलंयस? (थांबून) सांग ना त्याला बघून कोणाला वाटेल की या मुलाच्या एका आरोळीवर कॉलेज बंद व्हायचं, एका हातावर उसळायचं, एका शिटटीवर जमायचं आणि एका नजरेवर थांबायचं. मला त्याला त्याच जुन्या सत्याला भेटवायचं होतं जो टाकीवर लोकांना वाचवायला चढायचा, जीव दयायला नाही.*

दोघं चालत कॉरीडॉरच्या बाहेर येतात. समोर पहातात.

**FLASHBACK**

10. Ext/ College/ Day

समोर सकाळचं ९५ चं कॉलेज दिसतं आणि त्यांच्याच समोरुन सत्या आणि युवाशक्तीची टीम टाकीकडे पळत पळत चाललीये. सत्या सोबत अप्पू आहे जी आता पूर्ण टॉमबॉईश कपडयात आहे.

*अप्पूः वडलांनी आत्महत्या केलीये.शेतीला पाणी नाहीये. सावकारानी गुंड  बसवलेत. चार दिवसात पैसे नाही दिले तर जमीन जाणार. कालच तो म्हणला होता जगून काय उपयोग?*

टाकीवर चढतायत. जिन्यावरनं एक एक जण वर येतायत. खालून अनिरुध्द पहातो. तोही वर पळत पळत जातो.

*सत्याः (दारापाशी येत) नाव काय म्हणालीस?*

*अप्पूः अमित पाटील!*

10A. Ext/ Taki/ Day

सत्या दार उघडतो. समोर अप्पूचा आत्ताचा नवरा अमित खचून बसलेला आहे. साधे कपडे. स्लीपर. हातात टोपाझचं ब्लेड. तो हात कापणार एवढयात सत्या पळत पळत जातो आणि त्याला फानकन वाजवतो. ब्लेड टाकून देतो. अमित रडायला लागतो. सत्या त्याला कवटाळतो.

*सत्याः (कवटाळत) ऐ... हॉस्टेल आपलं घर आहे आणि तू आपला भाऊ, अन घरच्यांना जो त्रास दिल, त्याची सगळे मिळून घेऊ. चल!*

11. Ext/ Taki/ Day

ग्रामपंचायतीच्या बाहेर एका बाजूला सावकार, त्याचे चारपाच गुंड आणि दुसऱ्या बाजूला युवाशक्तीचे दहा बारा जण उभे आहेत. सत्या त्याच्या हातात पैसे देतो.

*सावकारः त्याचं तो बघेल की. पण तुम्ही कॉलेजची पोरं एवढया लांब कशाला आलात?*

*सत्याः लांब जाऊन लोकं जवळ येणार असतील तर जातो आम्ही. आत्ता जे पैसे दिलेत ते ठेवा. बाकी दर महिना दिल तो थोडे थोडे. आणि हां, परत जर ही डुकरं शेतात दिसली तर युवाशक्तीचं राज्यस्तरीय अधिवेशन आम्ही तुमच्या घरात भरवणार. हा पैलवान संग्राम मोहिते, युवाशक्ती जिल्हाप्रमुख. तुम्ही इकडं याच्या जमीनीकडं पाहीलं की तिकडं हयानी परसात खणायला घेतलंच.*

*ससाः (खिशातनं कॅट काढतो.) थांबताय का? भिकार सावकार खेळून जा.*

सगळे हसतात. सावकार चिडून निघून जातो. अमित सत्याच्या पाया पडतो.

*सत्याः (मिष्कीलपणे.) स्मॉल आहे रे! चला.*

*अमितः सर्वांनी जेऊन जायचंय हां दादा. प्लीज.*

*सगळे पुढे निघतात. मागे अप्पू आणि अनिरुध्द त्याच्याकडे स्तब्ध होऊन पहात राहीलेत.*

12. Int/ Amit House/ Day

भाकरी आगीवर फुगताना दिसते. अमित डायरेक्ट सत्याच्या पानात वाढतो. बाहेर पाऊस पडायला लागतो. अमित पहातो. दारापाशी जातो. मागे अमितची आई बहीण, अप्पू आणि एक दोन मुली भाकऱ्या थापतायत. समोर सत्या अनिरुध्द संग्राम आणि बाकीची गँग बसलेली.

*घटटः पुणं दोनच गोष्टींसाठी फेमस आहे. सारस बाग आणि सत्याचा राग. सावकार गारच.*

अमित दारापाशी जातो. सत्या त्याच्याकडे वळून पहातो.

*सत्याः काय झाल रें?*

*अमितः (पावसाकडे पहात) दोन महिने वाट पाहीली बापानी आणि जीव दिला. बघा ना दादा, आज जमीन आहे पाणी आहे पण पेरायला बाप नाही.*

सत्या घास घेत त्याच्याकडे पहातो. म्युझिक फेड इन होतं.

**SONG 1**

A. Ext/ Farm/ Day

युवाशक्तीची सगळी मुलं पावसात पेरणी करतायत. अमित सत्याकडे हसून पहातोय.

B. Ext/ Farm/ Day

सगळे पेरणी करुन चिखलात भरलेले दिसतात.

C. Ext/ River/ Evening

संध्याकाळी नदीत उडया मारल्या जातात. अनिरुध्द अप्पू उभे आहेत.

*अनिरुध्दः अरे काय गावठी बेवॉच चाललंय? तू नाही जात पाण्यात?*

*अप्पूः मी पाणी आणि कुत्री यांना बेक्कार घाबरते आणि त्यात कुत्र्यांबरोबर पाण्यात, नाही बाबा.*

तो हसतो. हसता हसता तिला ढकलतो. ती पडते. सत्या तिला पकडतो. ती बावचळून बाजूला होते.

D. Ext/ Some scenic location/ Night

रात्री सगळे शेकोटी भोवती जमलेले. समोर अनिरुध्द गातोय. सगळे टाळयांनी साथ देतात. अप्पू सत्याकडे पहाते.

E. Ext/ College locations / Early Morning

सकाळ सकाळचं ९५ सालंच कॉलेज दिसतं. बॅनर्स, पोस्टर्स, वेगवेगळया गोष्टींनी सजवलेलं. लाकडी जिन्यावरनं मुलं जाताना दिसतात. घंटा देताना बन्या बापू दिसतात. हॉस्टेल दिसतं, एक देन ठिकाणी कपडे चडडया टॉवेल वाळत घातलेले. टाकेश झाडताना दिसतो.

F. Ext/ Hostel toilets/ Early Morning

बेसिन समोर एक जण दात घासून उभा रहातो समोर काचे ऐवजी जुही चावला माधुरीचे फोटो लावलेले. मागून एक मुलगा ब्रश घेऊन जातो. टॉयलेटमध्ये जातो. कडी ऐवेजी टूथब्रश लावतो.

G. Int/ Hostel Room/ Early Morning

आरती करताना ससा दिसतो. नमस्कार करतो. शेजारच्याला उदबत्ती दयायला सांगतो. तो उदबत्तीच्या पाकीटातन सिगरेट काढतो. हा पेटवतो. फोटोवरच धूर सोडतो. सिगरेट ओढणाऱ्या जॅकी श्रॉफचा फोटो दिसतो.

H. Ext/ Hostel gate/ Early Morning

घटट, ससा, अमित, सत्या आवरुन लेक्चरसाठी हॉस्टेलमधून बाहेर पडतायत. अप्पू शेजारुन येऊन त्यांना भेटते. सगळे निघतात.

I. Ext/ College cycle stand/ Morning

सायकली लावलेल्या दिसतात डर बाजीगर दिवाना दिल अशी ही बनवाबनवी अशा मडफ्लॅप दिसतात.

J. Ext/ College caanteen/ Morning

कॅण्टीन मध्ये फक्त युवाशक्ती बोर्ड दिसतो. त्याच्या समोर सगळे बसतात. चहा वर चहा भरले जातात. क्रिमरोल बुडवले जातात. उधारीच्या बोर्डवर आकडे लिहीले जातात.

K. Ext/ College corridors/ Morning

वेगवेगळया वर्गाच्या लाकडी प्लेटस दिसतात. टी वाय बी ए दिसतं.

L. Int/ TYBA classroom / Morning

एका वर्गात मागच्या बाकांवर सामोसे खाल्ले जाताना दिसतात. त्याच्या पुढे च्युईंग गम. त्याच्यापुढे सत्या आणि अप्पू बसून फुली गोळा खेळताना दिसतात. वही भरलेली दिसते. आणखी एक कोरं पानं उलटलं जातं.

M. Ext/ Near main gate / Morning

“रक्षाबंधन निमित्त सीमेवरील जवानांना राख्या पाठवा” असा बोर्ड दिसतो. समोर सत्या, अप्पू, अमित,इतर असे सगळे फंड गोळा करताना दिसतात. अनिरुध्द पळत पळत येतो. मागे काही मुली आहेत. सत्या कॅण्टीनसमोर त्याला पायात पाय घालून पाडतो. त्याला बसवतो. मुली राख्या बांधतात. अनिरुध्द प्रत्येकीला फ्लाईंग किस देतो. मुली निघून जातात.

**SONG ENDS**

13. Ext/ College Swimming Pool/ Day

स्टॉपवॉच दिसतं त्यावर आकडे पळतायत. मागे स्विमिंग पूल दिसतो. रोहीत जवळ जवळ येताना दिसतो. एका पॉईंटला हात टेकवतो. उलटा फिरतो. पुन्हा पुढचा राऊंड सुरु करतो. त्याचा चेहरा पूर्ण दिसू नये.

14. Ext/ College Canteen/ Noon

कॅण्टीनच्या कॉर्नरपाशी सगळे जमतात. आजूबाजूला सायकली गाडया लावलेल्या. मागे अमजदचा डेस्क. त्यावर बरण्या. शेजारी रेडिओ चालू. मॅचची कॉमेंट्री.

*अनिरुध्दः हॉट असल्यामुळे जाम त्रास होतोय. चला सिट्रा पिऊया.*

*सत्याः एकही रुपया जमवलेला नाही अन्या. तुझा डबा डोक्यात घालणारे मी.*

*अनिरुध्दः इ... आण रे इकडे (डबा  हातात घेतो.) आलोच.*

इकडे तिकडे फिरतो. एक दोन जणांना पैसे मागतो. ते देत नाहीत. सत्या हसून पहातो. तेवढयात समोरुन रोहीत चालत येतो. तो स्पोर्टस वेअर मध्ये आहे. केस ओले. गळयात किटबॅग आहे.

*अनिरुध्दः काय स्विमर, काय म्हणतायत मासे? पाण्याखाली सगळं ठीक?*

*रोहीतः मस्त. नॅशनल्स आहेत ना नेक्स्ट मन्थ, जोरात तयारी.*

*अनिरुध्दः सॉलिड यार. ऑल द बेस्ट. बुडव एकेकाला तिकडं.*

रोहीत हसून त्याला पाठीवर मारतो. अनिरुध्द फंडाचा डबा पुढे करतो.

*रोहीतः ओ, ऑफ कोर्स! (पाकीटातनं दहाची नोट काढतो. टाकायला जातो. सत्या पुढे येतो.)*

*सत्याः काय जवानांबददलचं प्रेम म्हणावं का काय ?*

*रोहीतः (हसून १००ची नोट काढतो. समोर धरत) हॅपी? जवानांपर्यंत पोचतील ना पण?*

*(पैसे टाकणार इतक्यात)*

*सत्याः नको टाकू.*

*अनिरुध्दः ए तू टाक. अजून असतील तरी टाक.*

*सत्याः (हात धरत) बोललो ना एकदा. नको टाकू.*

*रोहीतः ॲज यू विश!*

रोहीत शांतपणे नोट पाकीटात ठेवतो. निघून जातो.

*अनिरुध्दः तुला राग आणि शिंक नको तिथं येते हां सत्या.*

सत्या त्याला बखोटीला धरतो. सगळे बाकावर येऊन बसतात.

*ससाः अरे ओ अनिरुध्द, कितने आदमी है.*

*अनिरुध्दः (सगळयांना मोजतो.) अप्पू धरके, आठ सरदार.*

कटटयावर फुटाफुटी होते. सत्या हसतो. अप्पू चिडून त्याला मारायला धावते.

*अप्पूः (एकदम भडकते. त्याच्यामागे लागते.) माझ्या नादी लागू नको हा. दुधाचे दात तरी पडलेत का बघ स्वतःचे. एफ वाय ला आलाय आणि टी वाय च्या पोरांबरोबर थांबतोय. लाज वाटते का? लेक्चर*

*नाही का तुला? नाहीतर जा आईच्या कडेवर बस जा जाऊन, हयाच्या आईचा गरीबांचा राहूल रॉय तुणतुण घेऊन बसतो वाजवत कॉलेजच्या गेटवर. पुढच्या वेळेला चल अलकाला आणि सांग तिकीटाचे पैसे दयायला त्याची सुरनळी करुन*

सत्या मध्येच तिला धरतो आणि शेजारी बसवतो. कॅण्टीनवाला कोल्ड्रींक आणून ठेवतो.

सत्याः थंड घे भगिनी निवेदिता.

अनिरुध्द एक राखी काढतो. तिच्यासमोर धरतो.

अनिरुध्दः बांध ना, भगिनी म्हणला तो तुला.

ती कोल्ड्रींक हातात घेते जोरजोरात हलवते आणि आख्खं त्याच्या अंगावर ओतते. ओला होऊन अनिरुध्द मधोमध उभा. सगळे हसतायत.

*अप्पूः (अॅक्शन करत) आता टॅलेंट हंट ला वाजव. तंबोरा!*

सगळे जोरजोरात हसायला लागतात. ती त्याच्याकडे बघून डोळा मारते.

15. Int/ Dance Hall/ Noon

दुपारच्या वेळेस एका हॉलमध्ये समोर मोठठे आरसे लावलेले आहेत. त्या समोर एक मुलगी नाचताना दिसते. दुसरी मुलगी तिला जॉईन होते. दोघी नाचतायत. पहिलीच्या नाचण्यात अप्रतिम फिनेस आहे. वेगवेगळया एँगलने त्या नाचताना दिसतात. हिना मध्येच थांबून उर्वशीकडे पहाते. उर्वशी पॅशनेटली नाचतेच आहे. सगळया काचांसमोरनं गिरक्या घेत घेत ती बेभान होऊन नाचत नाचत मध्ये येते. थांबते. समोर हिना टाळया वाजवते.

*उर्वशीः थँक यू थँक यू.*

15A. Ext/ Dance Hall corridor/ Noon

दोघी डान्स क्लासच्या कॉरीडॉर मधन बाहेर येतात. हिनाने स्वतःभोवती रुबाया घातलेला दिसतो. उर्वशी तिच्या मानाने मॉडर्न कपडयात. चालता चालता पिशवीतनं घुंगरु लावलेली किचेन बाहेर काढते.

*उर्वशीः पटकन चल. मला उसाचा रस प्यायचाय  जम्बो ग्लास आणि लगेच निघायचंय!*

*हिनाः का गं?*

*उर्वशीः बाबा आलेत पुण्यात. त्यांना भेटायचंय.*

उर्वशी कायनेटीक काढते. दोघी  कायनेटीक वर बसतात. आणि निघतात.

*हिनाः कालचं रंगोली पाहीलंस का? अपलम चपलम होता आणि त्यानंतर लगेच पिया तोसे...*

*उर्वशीः नाही गं. उठले तेव्हा चंद्रकांता सुरु झालं होतं.*

*हिनाः कालचा पाहीलास एपिसोड?*

गाडी बाहेर जाताना दिसते.

16. Ext/ Dance Hall corridor/ Noon

उसाच्या रसाचे दोन जम्बो ग्लास ठेवले जातात. मागे घुंगरांचा आवाज. आजूबाजूला लोकं बसलेली. आणि सिनेमाची हिरो हिरोईन्स ची पोस्टर्स लागलेली. जुनं गुऱ्हाळ दिसतंय.

*उर्वशीः (पिते. संपवूनच खाली ठेवते) पुण्यात हे सुख आहे गं. तिकडे सगळे जी जी करतच वागतात. एकदा म्हणलं भेळ हवीये. तीन भेळवाले गाडया घेऊन हजर. चहा प्यायचा तो पण आवाज न करता. बशीत चहा ओतून आवाज करत पिण्यात खरं काय मजा आहे. उदया आपण दोघीच ना लकी ला जाऊया. गपचूप. इराणी चहा आणि बनमस्का.*

*हिनाः जाऊ, जाऊ! अब्बा मला निकाह करुन इराणलाच पाठवतील. तू ये मग भेटायला.*

*(दोघी हसतात.) ऐक ना उर्वशी, मला तुला विचारायचं होत, मी टॅलेंट हंट ला नाही नाचले तर चालेल?*

*उर्वशीः अगं?! उदयापासन प्रॅक्टीस सुरु करु म्हणणार होते.*

*हिनाः अब्बांना कळलं तर प्रॉब्लेम होईल. क्लास पण बंद होईल. त्यांना कॉलेजमध्ये नाचलेलं नाही आवडणार.*

*उर्वशीः शिकायला अलाउड आहे. नाचायला नाही? तू नाच, कोणाला कळणारे घरी?*

*हिनाः मला एखादी गोष्ट करायची ना ती स्वतःसाठी, जगाला दाखवायला नाही, (जीभ चावते.)*

*उर्वशीः ठीके नाचते मी एकटीच. रस प्यायला तरी येशील का? का त्यालाही अब्बा नाही म्हणतील? (समोर पहात) बंधू, अजून एक रस!*

17. Int/ Rohit Room/ Night

लंडनचे वेगवेगळे फोटोज, ऑलिंपीक स्टार्स, यांच्या फोटोज नी भरलेली भिंत दिसते. पुढे ट्रॉफीज ठेवलेल्या दिसतात. मागे रोहीतचे वडील जोरजोरात बोलतायत. “ मी म्हणलं कोण युवाशक्ती? कोण शशी सातपुते? गोधडीत मुतत नव्हता तेव्हापासनं राजकारणात आहे मी. जा काय करायचं ते कर” सगळे हसतात. रोहीतच्या रुममध्ये उर्वशी बसून त्या सगळयाकडे पहातेय. रोहीत आत येतो. ती किटबॅग तशीच.

*रोहीतः अरे? बस बस. (एका कॉन्सलेशन लिहीलेल्या ट्रॉफीच्या कपात किल्ली टाकतो.)*

*मला माहीत नव्हतं तू आलीयेस.*

*उर्वशीः जबरदस्ती आणलं मला. हे बाहेर बसून नवीन स्कीम्स, पॉलिटीक्स बददल वगैरे बोलतायत. किती बोअरिंग ना.*

*रोहीतः (रोहीत बॅग ठेवतो. समोर उभा रहातो.) आय नो.*

*उर्वशीः मी पहिल्यांदा आले तुझ्या घरी. मस्त आहे घरं. ट्रॉफीज तर कमाल आहेत.*

*रोहीतः अजून खूप मिळवायच्यात.*

*उर्वशीः मिळवशील.*

*रोहीतः बाय द वे. लॉबॅरो युनिवर्सिटीला अप्लाय केलं परवा. इंग्लंड मध्ये आहे. बेस्ट युनिव्हिर्सिटी स्विमिंग टीम इन द वर्ल्ड. ड्रीम आहे, तिथं जाऊन शिकायचं, कॉम्पीट करायचं. कळेल आपण खरचं किती पाण्यात आहोत. (दोघं हसतात.)*

*उर्वशीः सुपर्ब यार. मी पण एम ए करुन डान्स स्कूल चालू करीन मोस्टली. माझा परफॉर्मन्स पायला ये हं, टॅलेंट हंट ला.*

*रोहीतः अरे. नक्कीच. (दोघं हसतात.) किती बरं आहे ना आपण छान काहीतरी परसू करणार आहोत. नाहीतर रोज आपलं याला पाडला, त्याला झोपवला, हयाला चेचला, हयाला तर बघतोच. पॉलिटीक्स आहे का कुस्ती कळतच नाही. (दोघं हसतात. तो टेबलवर बसतो.)*

*उर्वशीः तुझे आई बाबा...*

*रोहीतः अरे, हे टेबल डुगडुगतंय. (त्याकडे बघतो.) सॉरी तू काहीतरी म्हणत होतीस.*

*उर्वशीः पण तुझे आई बाबा काही म्हणत नाहीत का तुला?*

*रोहीतः काय?*

18. Int/ Aniruddha Home/ Night

रात्री अनिरुध्दची आई विचारते.

*आईः काय काय? हे युवाशक्ती वगैरे कॉलेजपर्यंत ठीक आहे, पुढे काये?*

मागे तारामतीला रेनकोट घातलेला दिसतो. अनिरुध्दच्या घरात अनिरुध्द, सत्या, आणि आई बसलेत. मागे टीव्हीवर अमूल सुरभि लागलेलं. आई पोळी वाढते.

*अनिरुध्दः (अर्धी करुन त्याला देतो. सत्या ते पहातो. ) पुढे तो खूप काय काय करणारे. त्याच्या डोक्यात सॉलिड प्लॅन्स आहेत. कॉलेजसाठी, शहरासाठी, तरुणांसाठी. मला फार आधीच कळलं होतं या मुलाच्या गा(थांबतो) अंगात दम आहे.*

*आईः त्याचं ठीक आहे. तुमचं काय? का तुम्ही इकोची लेक्चर बंक करण्यात करीयर करणारात?*

*सत्याः हयाच्या पण डोक्यात पण ठरलंय. त्याला कॉलेज बांधायचाय.*

*आईः डायरेक्ट बांधायचंय?*

*सत्याः हो. गिटारच्या आकाराची बिल्डींग, वर्गात बाकांच्या वर तबले. शिक्षकांच्या टेबल ऐवेजी पियानो, वहया ऐवेजी पेटया आणि पेनांऐवेजी पिपाण्या असाव्यात असा मोठा विचार आहे.*

*आईः अरे वा! येरवडयाच्या हॉस्पिटलचा नंबर काढते उदयाच.*

*सत्याः नाही, त्याला खरंच आपल्या कॉलेजमध्ये म्युझिक सेक्शन काढायचंय.*

*आईः ऐकतीये मी गेली चार महिने. काही होणार नाही असलं. तुला पोळी वाढू?*

*सत्याः नाही बास.*

*अनिरुध्दः कदर नाही रे कॉलेजला. कदर नाही. कळेल पुढच्या वर्षी मी सुपरस्टार झालो की.*

*सत्याः निघायचं? फार झालं!*

तिघंही टेबलवरुन उठतात.

18A. Int/ Aniruddha Home/ Night

पायात चपला सरकवल्या जातात. सत्या आणि अनिरुध्द निघतात.

*आईः त्याला रस्ता माहीत नाहीये? का एकटं जायची भिती वाटते?*

*अनिरुध्दः आम्हाला जरा बोलायचंय.*

*आईः किती वेळा सांगीतलंय रात्री बेरात्री कॅम्पस मध्ये नका फिरु. आपल्याला आधीच त्रास आहे.*

*अनिरुध्दः काळजी करु नको. आलोच.*

दोघं निघतात आई पहात रहाते.

18B. Ext/ College Ground/ Night

रात्री सत्या चालता चालता बोलतोय.

*सत्याः मी काय म्हणलं अमितला, माझ्या रुममध्ये रहा. आता कल्चरल चा हिशोब सांभाळायचं काम दिलं त्याला. मी पाहीलंय ना, तीन वर्ष जाम काटकसरीत काढलीयेत त्या पोरानी.*

इकडे तिकडे पहातोय. ग्राऊंडवर सत्याशिवाय कोणीच नाहीये. तो घाबरतो. अनिरुध्द च्या नावानी हाका मारतो. अनिरुध्द एका भिंती आड लपलाय हसत बाहेर येतो.

*अनिरुध्दः फाटली ना? आँ फाटली ना?*

हसत हसत टाळया मारत त्याच्या जवळ जातो. सत्या त्याला धरतो. सोडतो.

*सत्याः (धरत) प्रत्येकाला कसली ना कसली भिती असतेच राजा.*

*अनिरुध्दः पण एकट राहयची भिती? (हसतो.)*

*सत्याः आपलं हे सिक्रेट फक्त तुला माहीतेय. (त्याच्या हातात हात देतो. विचार करत)*

*अनिरुध्दः सगळे जण असं म्हणत मलाच का सांगतात आय डोन्ट नो.*

*सत्याः चल! बच्चन नको दयू.*

*अनिरुध्दः आई रक्ताची शप्पथ! आख्ख्या ग्रुप मधल्या प्रत्येकाचं एकेक सिक्रेट आहे माझ्याकडे.*

*सत्याः पण तुझ्यात मॅग्नेट आहे अन्या, माणसं ओढली जातात. आज पण बघत होतो मी काही कारण नसताना मला बोलवलं, खायला घातलं.*

*अनिरुध्दः ते? ते वाया गेल्यावर तसंही कुत्र्यालाच घालणार होतो. त्याच्याऐवेजी तुला!*

सत्या त्याची गचंडी धरतो.

*सत्याः तुझं सिक्रेट सांग की भाडया? आँ सांग? सांग ना...*

*अनिरुध्दः हल्ली शनिवार पेठेत रात्री हाकामारी येते ना, ती खरंतर मी आहे.*

दोघं हसत हसत चालत चालत युवाशक्तीच्या हॉलच्या दिशेनी जाताना दिसतात.

19. Int/ Yuvashakti hall/ Day

सकाळी बाहेरुन युवाशक्तीचा हॉल दिसतो. कॉलेजमध्ये रेग्युलर मुलांची ये जा चालू आहे. स्लो येतो. टाकेश समोर येतो.

*टाकेशः: काय स्लो. काय आहे का नाही?*

*स्लोः ऐ आज रक्षाबंधन आहे ना?*

*टाकेशः काल झालं स्लो! जा आत प्रॅक्टीस चालू आहे.*

दोघं आत येतात. नाटकाची प्रॅक्टीस चालू आहे. ससा मुकुट धोतर घालून उभा समोर घटट अतिशय घटट कपडयात. समोर सत्या अप्पू कंटाळलेले.

*ससाः दिक्कालांची अभेदय बंधनं तोडून, अशाश्वतांचे गुरफटणारे पाश फोडून, येतील सगळे मला भेटण्याकरता हातामध्ये...(थांबतो.) हातामध्ये...*

अमित आत येतो.

*अमितः हातामध्ये केळं घेऊन. मॅनेजमेंट ने केळं दिलं हातात. बंद करा प्रॅक्टीस. टॅलेंट हंट आता एकच दिवस होणारे.* (सगळे स्तब्ध होतात. सत्या आणि अप्पू उठून पुढे येतात.) *प्रत्येक कॅटेगरीत दहाच एन्ट्री आणि रोझ डे च्या पार्टीचं बजेट हजार ऐवेजी पाचशे. मॅनेजमेंट आणि ट्रस्टीजचा डिसीजन आहे. मी बजेट दयायच्या आत सरांनी सांगीतलं. मला म्हणाले फायनल आहे. करायचं तर करा नाहीतर नका करु.*

सगळे जमलेत. सत्या फक्त त्याच्याकडे पहातो. प्रचंड चिडलेला दिसतो.

*सत्याः चला, हीच ती वेळ!!*

19A. Ext/ College Office/ Day

धाडकन ऑफीसचं दार उघडतं. सत्या आणि अप्पू जोरात चालत आत पोचतात. मागे दहा बारा जण. टयात मुकुट घातलेला ससा, एक दोन ऐतिहासिक कॅरेक्टर्सही असावीत. सत्या अचानक थांबतो. शेजारी वाघमारे क्लार्कसमोर एक मुलगा पाठमोरा गयावया करतोय.

*सत्याः वाघमारे! कोणाला छळताय?*

*वाघमारेः फॉर्मला पन्नास रुपये कमी आहेत.*

सत्या शंभरची नोट काढून देतो.

*सत्याः पन्नास फॉर्मला आणि पन्नास खर्चाला (वाघमारे खुश) त्याला!*

तिथून तसाच निघून जातो. माईक समोर येतो. माईक ठोकतो. मागे घोळका जमलेला.

*सत्याः नमस्कार, आजच्या ठळक बातम्या. युवाशक्तीकडनं आत्तापासनं कॉलेज बंद. बंद. बंद. टॅलेंट हंट बददल मॅनेजमेंटची मुजोरी खपवून घेतली जाणार नाही. कुठल्याही स्टुडंटनी वर्गात थांबू नये आणि टॅलेंट हंट मध्ये सहभागी होऊ नये. दोन्ही केल्यास होणाऱ्या नुकसानीस मंडळ जबाबदार नाही. आजचं बातमीपत्र संपलं. धन्यवाद.*

मुलं आपाल्या वर्गातनं बाहेर पडतात. शिक्षक चकीत होतात. सत्या लाकडी जिन्यांवरनं चालत चालत जातो. त्याच्या मागे आता पंधरा वीस जणांचा जथ्था.

19B. Ext/ College Stairs/ Day

तो जथ्था वळतो. तसा मागनं घटट बाजूला होतो.

*घटट (मागच्यामागे एका मुलीला): अलका, आज कॉलेज बंदच आहे. मंगलाला येते का?*

(ती निघून जाते. दुसरी येते.) ऐय मंगला, आज कॉलेज बंद आहे अलका ला येते का? (ती पण निघून जाते. घटट तिसरीकडे पहातो.) अरे प्रमिला...

20. Int/ TYBA Classroom/ Day

एका वर्गापाशी जथ्था येउन थांबतो. मागनं वर्ग सुटलेले दिसतात. सत्या आत येतो.

*सत्याः आपणहून वर्गाबाहेर पडा आणि कुणीही यंदा टॅलेट हंट मध्ये भाग घेऊ नका.*

काही मुलं आवरतात. निघतात. बाहेर पडतात. हिना उठायला लागतो. उर्वशी थांबते. सर निघायच्या तयारीत.

*उर्वशीः दहाच मिनीट राहीलीयेत, तुम्ही शिकवा ना सर. (सत्या निघायला लागणार तेवढयात थांबतो.)*

*सत्याः आख्खं कॉलेज बाहेर पडलंय, तू आगाऊपणा करु नको.*

*उर्वशीः दहा मिनटानी काय फरक पडतो?*

*सत्याः दहा सेकंदानीही पडतो. तुला नसेल तुझा काका ट्रस्टी आहे.*

*उर्वशीः त्याचा काही संबंध नाहीये. मला शिकायचं असेल तर?*

*सत्याः शिक. पोरं बाहेरनं कडया लावतील, मग रात्रभर शिक.*

*उर्वशीः या असल्या धमक्यांना मी शाळेतही घाबरायचे नाही अरे.*

*सत्याः (अंगावर जात) ऐ (मधला बेंच उलथवून टाकतो.) झाशीची राणी व्हायला जाऊ नको, पार्सल करुन परत पाठवीन वाईला.*

सगळे मध्ये पडतात. रोहीत पुढे येऊन उर्वशीला बाजूला करतो. मागून अनिरुध्द येऊन मध्ये पडतो. सत्याला बाजूला घेतो. अप्पू तिच्या समोर जाते.

*अनिरुध्दः अरे काय क्लासमेटस असून दोस्तीत कुस्ती? चौथी पाचवीत आहात का?*

*रोहीतः प्लीज. प्लीज त्यांना घेऊन बाहेर जा.*

*सत्याः तू गप्प बस.*

*रोहीतः मी शांतपणेच सांगतोय. प्लीज.*

*अनिरुध्दः हो हो ठीके. चला रे. चल ए सत्या. अप्पू चल ग. (सगळे वळतात.)*

*अप्पूः अमूल सुरभि, आता तू बघ फक्त.*

20A. Int/ TYBA Classroom/ Day

सगळे निघून जातात. उर्वशी खाली पडलेली पुस्तकं उचलते. रोहीत तिला समजावत.

*रोहीतः आय डोन्ट अंडरस्टॅंड, तुम्ही कसे यांच्याशी कम्युनिकेट तरी करता?*

*उर्वशीः तुम्ही सगळे घाबरत असाल मी नाही.*

*रोहीतः मी घाबरत नाही, अवॉईड करतो.*

*उर्वशीः माणसं एखादया गोष्टीला तेव्हाच टाळतात जेव्हा तिला ते घाबरत असतात.*

*रोहीतः ओकेमी घाबर ट आहे. हॅप्पी? मला सांग यांच्या नादी लागून काय होणारे? यांना फक्त मारामाऱ्या आणि टाईमपास एवढंच करायचंय इथं येऊन. आणि मला नाही कॉलेजमधला हिरो वगैरे व्हायचं. एक आहे तो बास आहे.*

*उर्वशीः त्याची तर मी सगळी हिरोगिरी बाहेर काढणारे एक दिवस. चल बाय. मला रिहर्सल ला जायचंय.*

*रोहीतः तू भाग घेणारेस म्हणजे?*

*उर्वशीः म्हणलं ना, असल्या धमक्यांना मी लहानपणी पण नाही घाबरायचे अरे.*

रोहीत तिच्याकडे हसून पहातो. हिना तिच्या शेजारी येते. दोघी निघून जातात. तो पहात रहातो.

21. Ext/ Parking/ Day

उर्वशी आणि हिना कॉरीडॉर मधून चालत चालल्यात. हिना बाय करुन वळते. उर्वशी घुंगरांची किचन बाहेर काढून पार्कींगमध्ये गाडीपाशी येते. तिच्या गाडीवर एक मुलगा बसलाय. त्याचा सोबत दोन तीन मुलं.

*१ः खूप दिवस झाले तुला पाहतोय, आपल्याला तुझी फ्रेंड शिप पाहीजे.*

उर्वशी संतापाने त्याच्याकडे पहाते. जवळ जाते आणि फाडकन मुस्काडात ओढते.

*उर्वशीः सरक.*

*गाडीला किल्ली लावते. त्याच्या समोरुन तडफेनी निघून जाते. मुलगा रागाने पहात रहातो.*

22. Int/ Cultural hall/ Evening

बंद पडदा दिसतो. वर टॅलेंट हंट ९५ लिहीलेलं. निळू फुल्यांचा आवाज ऐकू येतो. एम जे दिसतो.

*एम जेः आमाला तुमचं तिकीट बी नको अन आमाला तुमचं मंत्रिपद बी नको. आमाला पायजे फक्त उर्वशी निंबाळकर. म्हणजे उर्वशी निंबाळकरचं भरतनाटयम.*

पडदा उघडतो. उर्वशी स्टेजवर नाच सुरु करते. एक माणूस घटम वाजवतोय. दुसरा बासरी वाजवतोय. उर्वशी बेभान होऊन नाचतेय. समोर छोटया हॉल मध्ये क्राऊड पहातंय. रोहीत पहिल्या रांगेत बसलेला. ती गिरक्यांवर गिरक्या घेतेय. अचानक एका क्षणी आवाज थांबतात आणि “जवा नवीन पोपट हा लागला मिठू मिठू बोलायला” सुरु होतं. घटट पोपटाचे कपडे घालून नाचत नाचत हॉल मध्ये येतो. सगळे त्याच्या मागोमाग नाचायला लागतात. स्टेजवर चढतात. एक जण घटम बडवायला लागतो. दुसरा बासरी प्रेक्षकात टाकतो. अप्पू घटट बरोबर वेडयासारखं नाचतायत. रोहीत वर चढतो. उर्वशी चिडून सत्याच्या अंगावर जाते. रोहीत तिला बाजूला खेचतो तरीही ती सत्याच्या अंगावर जातेच आहे. दोन ग्रुप पडलेले दिसतात. पडदा पडतो.

23. Int/ Principle cabin/ Evening

पूर्ण शांतता. प्रिन्सिपलचं केबिन दिसतं. जुनं. त्या केबिनमध्ये सगळे उभे आहेत. एका बाजूला रोहीत उर्वशी, एम जे. दुसऱ्या बाजूला युवाशक्ती गँग. उर्वशी त्या वेशातच उभी.

*अनिरुध्दः सर, युवाशक्ती पैकी कोणी केलं असेल तर मी माफी मागतो.*

त्याला मागून कोणीतरी टप्पल मारतं.

*उर्वशीः आता काय उपयोग? ज्यांना त्रास व्हायचा होता त्यांना झाला. (सत्याकडे रागाने पहाते.)*

*सत्याः प्रुफ दाखवा! (रोहीत सत्याकडे पहातो.)*

*अप्पूः आम्हाला वाटलं आधुनिक भरतनाटयम असेल नवीन पोपट वर म्हणून नाचलो. (सगळे हसतात.)*

*उर्वशीः धीस इज सिरीयस!*

*प्रिन्सिपलः आता तुम्हाला खूप मोठठ वाटतंय हे. दहा वर्षांनी आठवून हसाल. (सगळे हसतात.)*

*ससाः आम्ही तर आत्ताही हसतोय. (परत सगळे हसतात.)*

*प्रिन्सिपलः शेवटचं वर्ष आहे, सोडून दया. तसही यांनी सांगितल्यानंतर बऱ्याच एन्ट्रीज रदद झाल्याच होत्या, तुम्ही आता ॲन्युअल पार्टी करा तुम्हाला हवी तशी. नंतर प्रॉब्लेम नको.*

*उर्वशीः एवढंच लक्षात ठेवा. इथं मी कोणाचीही दादागिरी चालवू देणार नाही.*

*रोहीतः ठीकेसर. थँक यू. तू चल प्लीज.*

रोहीत आणि उर्वशी बाहेर येतात. युवाशक्तीची मुलंही त्यांचा मागून बाहेर येतात.

*उर्वशीः मी यांना नाही सोडणारे.*

*रोहीतः ते तुला त्यांच्या लेवलला आणतायत. जायचं का नाही हे तू ठरव. कळलं.*

उर्वशी त्याच्याकडे पहात रहाते.

*अप्पूः (हळूच) ए काकाला नको सांगू! (सगळे हसतात.)*

*घटटः भाई! पुण फेमस दोनच गोष्टीसाठी आहे... शनवार वाडा आणि सत्याचा राडा!*

सगळे निघून जातात. रोहीत पहिल्यांदा वर रागाने त्यांच्या कडे पहातो.

24. Ext/ Some restaurent or canteen/ Evening

कॅण्टीनमध्ये ग्लासात काडेपेटी टाकायचा खेळ चालू आहे. एक काडेपेटी उडणार एवढयात अनिरुध्द ती झेलतो. सत्या वर पहातो.

*अनिरुध्दः मालक, तिला जाऊन सॉरी म्हणा.*

*अप्पूः शुक शुक, मी केलंय हे! त्याचा काही संबंध नाही.*

*अनिरुध्दः एव्हरेस्टवर झेंडा रोवून आल्यासारखी काय उभी आहे? जा आणि आधी सॉरी म्हण.*

*अप्पूः सॉरी तर मी माझ्या बापालाही नाही म्हणले कधी.*

*अनिरुध्दः बाप भरतनाटयम नाचताना बंद पाडलं होतंस का कधी?*

*अप्पूः (त्याची गचंडी धरते.) चडडीत रहायचं हां! चडडीत रहायच! आणि ती जर परत सत्याला उलट बोलली तर परत नवीन पोपट देणार तिला! हिच्या च्यायला, झगामगा मला बघा. आणि तू केळया, तिथं सगळयांकडन माफी मागतो म्हणे, राजा हरिशंद्राची रॉकेल झेरॉक्स. पेपरवेटच घातला असता तुझ्या डोक्यात. सत्या नाही सॉरी बिरी बोलणार कोणाला! हां!*

*अनिरुध्दः (हळूच) सत्या, पुढं मोठा लिडर झाल्यावर तुला बॉडीगार्डची गरजच नाही रे. तयारच आहे बंदुक घेऊन! (तिच्याकडे पहात) बहादूर, साहब को सलाम कर!*

अमित हसायला लागतो. घटट पडतो. अप्पू चिडून त्याच्या मागे लागते. दोघं मारामारी करायला लागतात. पळत पळत लांब जातात. सत्या पुन्हा एकदा ग्लासात काडेपेटी टाकायला लागतो.

24A. Ext/ College Ground/ Evening

ग्राऊंडवर अप्पू पळत पळत मोठठी दगड मारतीये अनिरुध्द चुकवत पळतोय. दोस्तीत दोस्तीत म्हणतोय. धूळ उडतेय. एका पॉईंटला थांबतो. धाप लागते. खिशातनं पंप काढतो. बसतो. अप्पू काळजीने जवळ जाते.

*अप्पूः बरं वाटतंय का? आँ?*

*अनिरुध्दः (थांबून रोखून) तुला त्याची एवढी काळजी वाटते तर मग विचारत का नाही?*

*अप्पूः (त्याच्याकडे पहात) काय? क्रॅक आहे का रे?*

*अनिरुध्दः तो तुझा दर्द नाहीये?*

*अप्पूः (हलके लाजते.) येडायस तू!*

ती हसून पुढे निघून जाते. मागे अनिरुध्द बोलतोय.

*अनिरुध्दः घे ना आई रक्ताची शप्पथ? आँ? पुढच्या आठवडयात पार्टी आहे. पार्टीत सत्या पण आहे. आणि चान्स पण आहे. लोहा गरम है, और तू भी बेशरम है.*

ती पुन्हा वळून त्याला पुन्हा दगड मारते. तो दगड चुकवतो. फ्लाईंग किस देतो.

25. Int/ Rohit Home/ Day

बेल वाजते. कॅमेऱ्याला स्विमिंगचा गॉगल घातलेला दिसतो. रोहीत तो काढतो. फडक्याने पुन्हा एकदा नीट पुसतो. पुन्हा घालतो. क्लीअर दिसतं. एक नोकर रोहीतला कुरीअर आणून देतो. रोहीत त्या गॉगल मधूनच कुरीअर कडे पहातो. गॉगल काढतो. कुरीअर अधाशासारखं उघडतो. लॉबरो युनिव्हर्सिटीचं लेटर आलेलं दिसतं. रोहीत प्रचंड खूश होतो.

*रोहीतः (कुरीअर पहात) पप्पा कुठायत?*

*नोकरः महापालिकेत गेलेत ते.*

रोहीत लेटर आत टाकतो. बॅगेला चेन लावतो.

*रोहीतः बॅग गाडीत भरायला सांग रे. मी निघालो.*

एवढयात फोन वाजतो. तो उचलतो.

*रोहीतः काय? काय झालं दिनेश? आत्ता?*

लेटर बाजूला फेकतो तसाच पळत सुटतो. मागे स्विमिंगची बॅग दिसत रहाते.

26. Ext/ PMC Building/ Day

एका गेट मधनं रोहीत पळत पळत आत येतो. समोर पहातो पंचवीस तीस जण उभे आहेत वडलांना काळं फासायचा प्रयत्न चाललाय. वडलांच्या बरोबर असलेल्या तीन चार जणांना धक्काबुक्की चालू आहे. आजूबाजूला सगळे युवाशक्तीचा विजय असो, युवकांची राखीव जागा घशात घालणाऱ्या भोसलें हाय हाय अशा घोषणा चालू आहेत. रोहीत गर्दी कापत आत जायचा प्रयत्न करतो. त्याला घुसताच येत नाहीये, त्याचे वडील धक्यामुळं पडतात. तो चवताळून उठून एकेकाला कापत त्यांच्या जवळ जातो. उठवतो. कसाबसा बाहेर काढतो.पोलिस येतात. तो त्यांना गाडीत बसवतो. मागे घोषणांचा जोर वाढलाय. तो वडलांना घेऊन बसतो. त्यांच्या चेहऱ्यावरच काळं पुसतो.

*रोहीतः मी आहे पप्पा. मी आहे.*

समोर पहातो. ड्रायवरला निघायची खूण करतो. तेवढयात गाडीच्या काचेवर काळं ओतलं जातं. मागे शशी सातपुते जिंदाबाद, युवाशक्तीचा विजय असो घोषणा दुमदुमतायत. रोहीत त्याकडे प्रचंड चिडून पहातो, तेवढयात धाडकन शेजारनं काचेवर दगड बसतो. दार उघडतं आणि त्यालाही फासण्याचा प्रयत्न होतो.

27. Int/ Bathroom/ Evening

बाथरुम मध्ये बेसिनच्या आरशासमोर रोहीत उभा आहे. युवाशक्तीच्या घोषणा ऐकूच येतायत. स्वतःला पहातो. प्रचंड चिडलाय. तोंडावर पाणी मारतो. लागलेलं काळं पुसतो. लक्षात येतं आख्खा शर्टच काळा झालाय. त्या शर्टाकडे पहातो. फाडून टाकतो.

28. Int/ Cultural Hall/ Night

पार्टी १९९५ चा बोर्ड दिसतो. मागे फिशपाँड चालू आहेत.  अनाऊन्समेंटः नेक्स्ट फिशपाँड अनामिक टि वाय टू प्रमिला टी वाय! तू गुलाबाचं फूल आहेस. पण आडनाव आहे काटे... तू गुलाबाचं फूल आहेस. पण आडनाव आहे काटे... मिठी मारली तर टोचशील का? हीच भीती वाटे!!

सगळे टाळया शिटटया मारतायत. घटट लाजतो. हातात गुलाब. एका कोपऱ्यात मुलीसारखा ड्रेस घालून अप्पू, घटट, ससा, अमित सगळे उभे आहेत. सगळयांच्या हातात गुलाब. अप्पूचं लक्ष सत्याकडेच आहे. सगळे कोल्ड्रींक्स पितायत. दुसऱ्या कोपऱ्यात उर्वशी, हिना, मागे टाकेश हातात ग्लास घेऊनच उभे आहेत. अचानक पडदा उघडतो. समोर अनिरुध्द उभा आहे.

*अनिरुध्दः टाकेश, काय आहे ना का नाही? ( टाकेश हात वर करतो.) अमजद, कितने आदमी है? (सगळे ओरडतात. पचास सरदार) आणि बन्या बापू कुठायत? (ते दोघं मुलांमध्ये बसलेत हात वर करतात.) आपण पार्टीला टीचरना बोलवत नाही पण यांना बोलवतो, कारण कॉलेजची शान जरी प्रोफेसर्स असले तरी जान ही सगळी मामा लोकआहेत. (टाळया) टी वाय ची बॅच, तुमचे शेवटचे सहा महिने आहेत! म्हणजे पास झालात तर! (सगळे हसतात.) तर, खास तुमच्यासाठी दोन ओळी. मी तिला फक्त पाहीलं, (लोकं वा वा करतात.) बरं का मी तिला फक्त पाहीलं आणि डोळयासमोर अंधार झाला. नंतर मला कळलं, खरंच लाईट गेले होते! (सगळे हसतात.) तर आज, ज्यांना पहायचंय, ज्यांना विचारायचय ज्यांना नाचायचंय त्यांनी सगळं करुन घ्या! (अप्पूला) खास तुमच्यासाठी फार मोठया गीतकाराचं गाणं आहे ढापून वापरतोय. एक दोन तीन.*

**SONG 2 STARTS**

कल्ला सुरु होतो. लोकं उठून नाचायला लागतात.

**M1 :** *उर्वशीः मी फक्त तू आग्रह केला म्हणून आलेय. झालं की लगेच जाऊ.*

*हिनाः लास्ट इयर आहे गं. मग परत कधी हे सगळं मिळणार? रोहीत नाही आला का?*

*उर्वशीः फोन नाही उचलला.*

**M2 :** *अप्पू (सत्याला): सत्तू जरा बोलायचंय!*

*सत्याः बोल ना!*

*अप्पूः बाहेर!*

*सत्याः झालं की जाऊ! (तिच्याकडे पहात) आणि तू पोरीसारखी का दिसतेय? (ती फटका मारते.)*

गाणं संपतं. कल्ला होतो. सत्या आणि अप्पू बाहेर निघतात. इकडून उर्वशी आणि हिना निघतात.

29. EXt/ Outside Cultural Hall/ Night

हिना आणि उर्वशी बाहेर येतात, त्यांच्या मागून दार उघडून अप्पू आणि सत्या.दोघं विरुध्द दिशेला वळतात. एका कोपऱ्यात टयूबच्या प्रकाशात सत्या आणि अप्पू उभे आहेत. मागे पार्टीचा आवाज चालूच.

*सत्याः बोल अप्पू!*

*अप्पूः (कमालीची ऑकवर्ड) सत्तू बरेच दिवस झाले मी सांगीन म्हणतेय, पण जमत नाहीये. म्हणजे तुला माहीतेय मला वॅनिला आईस्क्रीम आवडतं, मला माहीतेय तुला गोल्डस्पॉट आवडतं. म्हणजे तू मला भगिनी निवेदिता म्हणतोस पण... मला तुझ्याबददल... (एक गुलाब पुढे धरते.)*

एवढयात रपारप गाडया जातात शेजारुन, आणि सत्या वळून तिकडे पहातो. गाडया थांबतात. उर्वशीच्या तोंडावर लाईट मारला जातो. आवाज येतो. “आली रे”, उर्वशीला काही कळायच्या आतच त्याच दिव्याच्या प्रकाशात तिने ज्याला मारलं तो मुलगा समोर येतो. त्याच्यामागे दहा बारा मुलं.

*मुलगाः बाटली आण रे.*

शेजारचा बाटली आणतो. तिच्यावर टाकणार एवढयात हिना मध्ये पडायला जाते. हा तिला बाजूला ढकलतो. समोर पहातो तर सत्या उभा आहे. हिनाला अप्पू उठवते. उर्वशीला सत्या मागे करतो. त्याला फानकन पेटवतो. मुलगा कोलमडून खाली पडतो. समोरचे आठ दहा जण येतात. सत्या मातीत हात घालून बाहेर काढतो. मुठीतनं माती उडवतो. तसाच एकेकाला मारत सुटतो. आरडाओरडा होतो. बाटल्यांचा क्रेट उचलला जातो. झाडावरनं गुप्ती निघते, सायकलच्या चेन काढल्या जातात.

29A. Int/ Cultural Hall Stage/ Night

अनिरुध्द गिटार आत टाकतो. त्याला आवाज ऐकू येतो.

*१ः अरे सत्याचा राडा झाला मोठ्ठा!!*

अनिरुध्द सुसाट पळत सुटतो.

29B. EXt/ Outside Cultural Hall/ Night

सत्या मारतोच आहे. इतर सगळयांची पण मारामारी सुरु आहे. बन्या बापू, टाकेश पण एकेकाला बडवताना दिसतात. सत्या उर्वशीवर ॲसिड टाकणाऱ्याला लोळवतो. त्याच्या छातीवर पाय ठेवतो.

*सत्याः माशाला पोहायला आणि बापाला मारायला नाही शिकवायचं.*

मागनं कुणीतरी ओरडतं अनिरुध्द बेशुध्द पडलाय. सत्या त्याला सोडून पळतो. अनिरुध्द भोवती घोळका जमलाय. सत्या त्याला तसाच उचलतो.

*उर्वशीः (लगबगीने) मी गाडी आणते.*

त्याला गाडीत टाकलं जातं. सत्या पॅनिक झालाय.

*सत्याः ए पॉजिटीव्ह चार जण हॉस्पिटलला पाठवा. तासाभरात जेवढे जमतील त्याच्यासोबत पाठवा. दोन जण याच्या घराखाली थांबा आईला कोणी सांगू दयू नका. आणि येताना तारामतीला आणा. चल गं ( उर्वशी त्याच्याकडे अवाक होऊन पहातेच आहे. गाडी स्टार्ट करते. गाडी निघते.)*

30. Int/ Hospital/ Night

अनिरुध्दला अॅडमिट केलं जातं.  तो बेडवर झोपलाय. समोर सत्या उर्वशी हिना.

*डॉक्टरः शुध्दीत येईल थोडयावेळात. त्याला पॅनिक मुळे दम लागला एकदम, त्यात डोक्यात रॉड लागलाय.*

*सत्याः (दार उघडून बाहेर जातो. कॉरीडॉर मध्ये चार मुलं अमित आणि अप्पू. अप्पूच्या हातात तारामती. उर्वशी आतून ऐकतेय. गहीवरलीये. अमित सत्याला पैसे देतो. )*

*सत्याः तुम्ही सगळे जा. तो शुध्दीवर येईल थोडयावेळात. तुम्ही जेऊन घ्या.*

*ससाः तू आलास की जेवू. एकत्र.*

*घटटः सत्या, वाट पहातोय जेवायला.*

सगळे निघतात. अप्पू आणि अमित थांबलेले. सत्या त्यांनाही खुणेनी जायला सांगतो.

आता तिघं त्याच्या समोर उभे आहेत.

31. Int/ Hospital/ Night

अनिरुध्द हळूहळू डोळे उघडताना दिसतात. अनिरुध्द थम्स अप ची खूण करतो. सत्या पण करतो. उर्वशी पण करते. हिना पण करते. चौघ थम्सअप करुन उभे.

*अनिरुध्दः अरे, थम्सअप मिळेल का? घशाला कोरड पडलीये.*

तिघं हसतात. अनिरुध्द हसतो. उर्वशी रिलीफने सत्याला मिठी मारते. कोपऱ्यातून वळताना हे अप्पू पहाते.

*उर्वशीः थॅंकयू सत्या.*

*सत्याः थॅंक यू काय? स्मॉल आहे गं!*

तिच्या डोक्यावर हात ठेवतो. अनिरुध्द भुवयी उंचावतो. सत्या हात काढतो. तिच्याकडे प्रेमाने पहातो.

**SONG 3 STARTS**

A.Ext/ Hostel/ Night

रात्री हॉस्टेलच्या बाहेर उर्वशीची गाडी थांबते. सत्या तिच्या गाडीतून उतरतो. ती सत्याला बाय करते.

B.Int/ Urvashi Hostel room/ Night

उर्वशी अंथरुणात पडते. सत्याचाच विचार करतेय. सत्याचे फ्लॅशेस जातात. स्वतःशीच हसते.

C.Ext/ Yuvashakti Room/ Day

सकाळी युवाशक्तीच्या कट्टयावर सगळे बसलेत. शेजारनं स्लो येतो.

*स्लोः हॅलो, आज फंक्शन आहे ना?*

*सगळेः काल झालं स्लो!*

सगळे पडी घेतात. सत्या बाजूला बसलाय. समोरुन उर्वशी जाते. तिला हात करतो. ती पण हात करते.

D.Ext-int/ various locations/ Day-night

रात्री उर्वशी पत्र लिहीते. सकाळी हिनाला देते. हिना पत्र दुपारी अनिरुध्दला देते. अनिरुध्द रात्री सत्याला देतो. सत्या रुममध्ये पहातो. पत्र लिहीतो. दुपारी अनिरुध्द वाचतो. डोक्याला हात लावतो. रात्री स्वतः लिहीतो. दुपारी हिनाला पत्र देतो. ती संध्याकाळी पत्र उर्वशीला देते.
(यात वेगवेगळे डेज जावेत. साडी डे, टाय डे, ट्रॅडिशनल डे, ब्लॅक ॲण्ड व्हाईट डे.)

E.Ext-int/ various locations/ Day-night

रोहीतची काचेवर काळं ओतलेली गाडी दिसते. एक माणूस गाडी धुवायला जाणार रोहीत त्याला थांबवतो.

*रोहीतः नको धुवू.*

रोहीत गाडीकेडे एकटक पहातो. स्वतःच्या खोलीत येतो. कप्प्यातनं युनिर्व्हसिटीचं लेटर काढतो. टेबल हलतच आहे. तो लेटरची घडी करतो. आणखी एक करतो. आणखी एक करतो. आणखी एक करतो. आणि बसून टेबलच्या पायाखाली लावून टाकतो. टेबलाला हात लावतो आता ते पक्कं बसलंय.

F.Ext / College Taki/ night

रात्री सत्या उर्वशी अनिरुध्द तिघंच टाकीवर गप्पा मारताना दिसतात. अनिरुध्द खुणेनीच मी जातो तुम्ही सुरु व्हा अशा खुणा करतो. ती त्याला मारते.

G.Ext / Road/ Evening

उर्वशी आणि सत्या कायनेटीक वर बसून वडापाव खातायत. एम जे गाडी थांबवून पहातो.

H.Ext / College stairs / Day

कॅण्टीनसमोर अप्पू पुन्हा एकदा मुलाच्या वेशात उभी. समोर सत्या आणि उर्वशीच्या कॉरीडॉरमध्ये खाणाखुणा चालू दिसतात. अनिरुध्द मागून तिच्या खांदयावर हात टाकतो. दोघेही ते पहातात.

*अनिरुध्दः चालायचच!*

*अप्पूः माझं का सांत्वन करतोयस तू? मला काय झालंय?*

*अनिरुध्दः न दिसणारी दुख जास्त बोचतात.*

*अप्पूः बोच्या बच्चन नको दयू चल.*

दोघं निघतात.

**SONG 3 ENDS**

31. Ext/ Rohit home lawn/ Day

रोहीतच्या घरात एम जे बसलेला दिसतो. रोहीत समोर उभा आहे.

*रोहीतः खूप केलं अव्हॉईड. पण त्यानी माझ्या घरात घुसून मला बाहेर काढलंय. आता मला ऑप्शनच नाहीये.*

*एम जेः नॅशनल्स होत्या ना काल?*

*रोहीतः आता काही नाही. आता फक्त मी आहे. आणि युवाशक्ती आहे.*

*युवाशक्तीचा बोर्ड दिसतो.*

32. Int/ Yuvashakti office/Day

आतमध्ये सत्या आणि शशी सातपुते बसलेले दिसतात. टिपीकल युवा संघटनेचं ऑफीस आणि मटेरिअल.

*शशी सातपुतेः (पेपरवेट फिरवत) बापाचंच झालं होतं ना शहर. दोन आमदार, महापालिका, चार पाच बँका, पेपरवाले, कॉलेज यांचचं राज्य आहे. त्यांना वाटलं कोण आडवं येणार? म्हणलं घे. साहेबांनी कौतुककेलं आपलं. म्हणल शाई तो सिर्फ झाकी है, पूरा इलेक्शन बाकी है. परवा विचारत होते, तुमच्या कॉलेजचं काय आहे? मी म्हणलं, ढांगेखालनं जाईन साहेब सत्यानी कॉलेज मारलं नाही तर! जिंकलास तर शहर कार्यकारणीत बसशील. मग आपल्या शिवशक्ती पक्षाचं काम आहेच पुढे!*

*सत्याः पुढच्या शहर कार्यकारणीच्या मिटींगला एकत्रच जाऊ मग! साहेबाना सांगा, काहीही झालं तरी आमच्या कॉलेजवर एकच झेंडा फडकणार, युवाशक्तीचा!*

शशी पैशाचं बंडल काढतो. त्याच्यासमोर ठेवतो.

*शशीः पोरांना खायला घाल चांगल.*

सत्याः ती रोजचं जेवली तरी मत आपल्यालाच देणार. टेंशन नका घेऊ.

पैसे परत देतो.पैसे परत दिले जाताना दिसतात.

33. Ext/ College Taki/ Night

रात्री टाकी दिसते. सत्या आणि उर्वशी दोघंच टाकीवर उभे. समोर कॉलेजचा परिसर. आणि मागे बदामात अनेक नावं कोरलेली. ती त्याकडे पहातेय. वीट घेऊन बदामात यू आणि एस लिहीते.

असंख्य बदामांमध्ये त्यांचंही नाव लिहीलेलं दिसतं.

*सत्याः तुला ना फालतू गोष्टींची जाम आवड आहे हां.*

दोघं बसतात.

*उर्वशीः अनिरुध्द कोणाला बोलणार नाही ना रे आपल्याबददल?*

*सत्याः नाही.*

*उर्वशीः क्रॅक आहे तो, मला म्हणे आता तुम्ही अध्यक्षांची बायको.  घरी या आईला ओटी भरायचीये.*

*सत्याः त्यानी तुझ्यासाठी बोरकुट दिलंय.*

*(तिला बोरकुट काढून दाखवतो. ती त्याच्या गुडघ्याभोवती हात ठेऊन बसते.)*

*सत्याः तू पहिली मुलगी आहेस माझ्या प्रेमात पडलेली. उंची जास्त असल्यामुळे भेटेल त्या सगळया पोरी आपल्याला दादाच म्हणायच्या.*

*उर्वशीः काये ना, आत्ता पर्यंत मी फक्त अशी लोक पाहीली जी फायदयासाठी, पदांसाठी, मानासाठी आजूबाजूच्या लोकांना वापरतात आणि काम झालं की बघत पण नाहीत. तू तसा नाही वाटलास,म्हणून प्रेमात पडले. सेल्फलेस आहेस तू. पण कसलं भारी ना... आपण कधीच एकमेकांशी बोललो नाही. खरंतर खुन्नस होती. आणि आता प्रेमात आहोत.*

*सत्याः खुन्नस असलेल्या पोरापोरींचीच नंतर लफडी होतात. दिल पिक्चर पाहीला नाही का?*

दोघं हसतात. हसता हसता जवळ येतात. एकमेकांच्या डोळयात डोळे घालून पहातायत.

*सत्याः बरं वाटलं तुला भेटून. पहिल्यांदा कोणीतरी इतक्या...*

तो बोलायच्या आतच उर्वशी त्याला किस करते.  दोघांमध्ये एक सुंदरसा मोमेंट जातो. ते कडकडून मिठी मारतात. टाकीवर मागे नावांनी भरलेली भिंत दिसत रहाते. त्यावरच टॉर्च मारला जातो.

**PRESENT DAY**

31A. Ext/ College Taki/ Night

आता त्या भिंतीवर काहीही नाही. आता समोर अप्पू आणि प्रताप उभे दिसतात. ते तिथे आलेत.

प्रतापने टॉर्च मारलाय.

*प्रतापः कुणालाही बोलू नको आपण आलोय इथं. मला एकदा स्वतःच्या हातानं चेक करु दे.*

सगळीकडे टॉर्च मारुन पहायला लागतो.

*अप्पूः मला कळलं नाही पण या सगळयात तू कुठं होतास प्रताप?*

*प्रतापः गर्दीत. प्रत्येक कॉलेजमध्ये गर्दीतली पोरं नसतात का? स्कॉलर नसलेली, कला न येणारी, पोरी पटवायची फक्त इच्छा असलेली, स्मार्ट पोरं ज्यांना कटवतात अशी, त्यातलाच. त्यात एन सी सी, म्हणजे दुष्काळात तेरावा. जेव्हा आख्ख कॉलेज कॅण्टीनमध्ये बसून बर्ड वॉचिंग करायचं आम्ही ग्राऊंडवर उभं राहून पाय आपटायचो. आपटाआपटीतच गेली पाच वर्षं.*

*अप्पूः मग सत्याला कसलं देण लागतोस तू?*

*प्रतापः (हसतो.) जुनं कनेक्शन आहे.*

टॉर्च मारतो.

31B. Ext/ College Taki/ Night

सत्या आणि अप्पू ऑफिसमध्ये वाघमारे समोर उभे आहेत.

*वाघमारेः फॉर्मला पन्नास रुपये कमी आहेत. नाहीयेत म्हणतोय.*

सत्या शंभरची नोट काढून देतो.

*सत्याः पन्नास फॉर्मला आणि पन्नास खर्चाला (वाघमारे खुश) त्याला!*

मुलगा वळून पहातो. तो प्रतापच आहे हे दिसतं. प्रताप वळून त्याला थँक यू म्हणणार, सत्या निघून गेलेला आहे. प्रताप तसाच त्याच्याकडे पहातो.

*प्रताप व्ही ओः त्या दिवशी सत्या माझ्याही आयुष्यात घुसला. इतके दिवस ऐकला होता. तेव्हा पाहीला. सगळयांसारखाच माझाही हिरो झाला तो.*

आत्ताच्या प्रतापचा चेहरा उजळतो.

*प्रतापः रोज रात्री रुम मध्ये आरशासमोर उभा राहून त्याच्यासारखी स्टाईल मारायचो मी. बघून बघून मी ही अनेक गोष्टींना "स्मॉल आहे रे" म्हणायला लागलो. डिपार्टमेंट मध्ये आत्ताही सगळयांना माझी*

*ही स्टाईल माहीतेय. सत्याचीच आहे ती. पण मला सारखं वाटतंय की इथं सत्या बरोबर कोणीतरी येऊन गेलंय? असो चल.*

दोघं निघायला लागतात. एवढयात त्याची नजर कशावर तरी पडते. तो पहात रहातो. टॉर्च मारतो. टॉर्चच्या प्रकाशात एक घुंगरु दिसतो. प्रताप घुंगरु उचलतो. त्याकडे पहातो.

*प्रतापः सत्यानी लावणीचा प्रॉग्राम तर ठेवला नसेल पडायच्या आधी? पण ही का येईल?*

*अप्पूः (घुंगराकडे पहात) जुना हिशोब कायमचा मिटवायला माणूस कुठही जातो. ही तर फक्त टाकी आहे.*

अप्पू दिसत रहाते. घुंगरु दिसत रहातं. त्यावरच ढोल ताशांचा आवाज सुरु होतो.

32. Ext/ College Porch/ Day

१९९५ स्टुंडट इलेक्शनचा बॅनर लागतो. त्याच्या समोर मुलांची गर्दी जमलेली, गुलाल उधळला जातोय. एकजण बेभान होऊन ताशा वाजवतोय. चार पाच ढोल वाजतायत. उत्सवी माहौल आहे.

एका रुममध्ये सत्या फॉर्म भरतो. त्यावर सही करतो.

*अनिरुध्दः (कानात म्हणतो.) वहीनी पायजे होत्या यार.*

*सत्याः वाईला गेलीये.*

सत्या फॉर्म सबमिट करतो.

*सरः अभिनंदन! तुला ऑल द बेस्ट कराची काय गरजच पडून नाय राहणार.*

सत्या वळतो दार उघडून बाहेर येतो. युवाशक्तीच्या नावानी घोषणाबाजी सुरु होते. कॉरीडॉर मधनं चालत चालत जिन्यावरुन खाली येतो. आजूबाजूला पोरांचा जथ्था. युवाशक्तीच्या नावानी घोषणा बाजी चालूच आहे. गर्दीतन मागं काढत सत्या युवाशक्तीच्या कटटयावर उभा रहातो. त्याच्या मागे अमित अप्पू घटट उभे रहातात. अनिरुध्दला वर बोलवतात तो नाही म्हणतो.

*घटटः पुणं फेमस दोनच गोष्टींसाठी आहे. सिटी ऑफ नॉलेज, आणि सत्याचं कॉलेज.*

(पब्लिक उसळतं.)*आता निवडणूक बिनविरोध होणार आहे. (सगळे उसळतात.) या कॉलेजमध्ये सत्याच्या समोर फॉर्म भरण्याइतकं फॉर्ममध्ये कुणीही नाही. जर कोणी असेल तर त्यानी हात वर करावा, मी स्वतः त्याचा फॉर्म भरुन दीन.*

सगळे हसतात.

*घटटः आहे का कुणी? बोला आहे का?*

एक आवाज येतो. आहे. सगळे थांबतात. पुन्हा आवाज येतो. आहे. सगळे वळतात. समोरच्या चौथऱ्यावर रोहीत उभा दिसतो.

*रोहीतः आहे.*

शांतपणे बाजूला होतो. त्याच्या बरोब्बर मागे उर्वशी उभी दिसते. ती समोर येते. सत्या अप्पू अनिरुध्द अमित अवाक होतात. कुजबूज सुरु होते. सत्या हैराण आहे. उर्वशी समोर पहातेय.

*रोहीतः राजकारण जिच्या रक्तात आहे. विदयार्थ्यांचं हित जिला आधी कळतं, अशी शांत सुसंकृत आणि हुशार, वाईच्या माननीय आमदार समरराजे निंबाळकरांची एकुलती एक मुलगी, स्टुडंट फोरम कडून या कॉलेजची पहिली महिला जी आर होणार... आपली लाडकी उर्वशी निंबाळकर!*

उर्वशी त्याच्याकडे पहाते. तो हाताने समोर अभिवादन करायला सांगतो. चष्मा सरळ करुन सत्याकडे पहातो. सत्या त्या दोघांकडे पहातो. ती अभिवादनासाठी नमस्कार करते. दोन चौथऱ्यांवर दोघं उभे मधोमध गर्दी जमलेली. दोघांमध्यल्या अंतरातच मध्यंतर अशी अक्षरं उमटतात.

## ****** INTERVAL *****

32. Ext/ College Porch/ Day

उर्वशी त्याच्याकडे पहाते. तो हाताने समोर अभिवादन करायला सांगतो. चष्मा सरळ करुन सत्याकडे पहातो. सत्या त्या दोघांकडे पहातो. ती अभिवादनासाठी नमस्कार करते. दोन चौथऱ्यांवर दोघं उभे मधोमध गर्दी जमलेली. दोघांमध्यलं अंतर स्पष्ट दिसतंय.

33. Ext/ Garden/ Noon

भर दुपारी एका बागेमध्ये सत्या आणि उर्वशी बसलेले. तो प्रचंड चिडलेला. ती शांत थोडी घाबरलेली.

*सत्याः मी लढाईला उभा रहात असतानाच तुला दुष्मनांच्या सैन्यात जाऊन धार लावायची होती!*

*उर्वशीः हे बघ...*

*सत्याः तू मला काही समजाऊ नको. मी सगळी तयारी केलीये, हे इलेक्शन माझ्यासाठी किती महत्वाचं आहे. माहीत नव्हत तुला?*

*उर्वशीः मला माझी बाजू सांगण्याचा चान्स देणारेस का नाही?*

*सत्याः का देऊ? तू विचारलं का मला?*

*उर्वशीः आणि जर मलाच माहीत नसेल तर? ऐनवेळेस कळलं असेल तर?*

*(शांतता जाते.) मी परवा बाबांबरोबर पुण्यात आले आणि त्यांनी मला रोहीतच्याच घरी नेलं. मला काही माहीत नव्हतं माझ्यापुढे काय वाढून ठेवलंय ते.*

33A. Int/ Rohit House/ Night

ताटात काही चटरफटर गोष्टी आणून टेबलावर ठेवल्या जातात. रोहीतच्या घरात सगळे जमलेले दिसतात. रोहीतचे वडील आता रिकव्हर्ड आहेत. उर्वशीचा काका चिडलाय.

*काकाः तुम्ही शांत बसलात भोसले साहेब पण या युवाशक्ती वाल्यांना मी नागवा करुन फटकवणारे एक दिवस. दुसऱ्या दिवशी कार्यकर्ते पाठवले होते विचारा,रोहीत नाही म्हणाला.*

*रोहीतः फालतू मारामारी करुन काय मिळणारे?*

*काकाः पण हयांची दादागिरी सहन कशाला करायची?*

*रोहीतः मग वेगळी पध्दत नाही का रिॲक्ट व्हायची? आणि आम्हाला सवय आहे. कॉलेजमध्येही तेच करतोय आम्ही. नाही उर्वशी?*

*उर्वशीः आँ? हो.*

उ.*वडीलः मग तुम्ही करताय काय? आपल्याकडं एवढा मोठा पक्ष आहे, स्टुडंट फोरम आहे, पैसा आहे. घुसा. भोसले साहेब, तुम्ही रोहीतला कॉलेजच्या इलेक्शन ला उभा करा, मी बघतो कसा नाही निवडून येत तो.*

*रोहीतः काका, माझीही इच्छा आहे स्टुंडट फोरम नी ही इलेक्शन लढवावी. फक्त मी ती नाही लढवणार.*

*उ. काका: मग आता काय आम्ही लढवू अ‍ॅडमिशन घ्यून?*

*रोहीत: नाही. उर्वशी! (सगळे चपापतात. रोहीत उभा रहातो.) माझं पूर्ण ऐकून घ्या. मग डिस्कार्ड करा. ती पहिल्यापासनं युवाशक्तीच्या दादागिरी विरुध्द उभी आहे, तिला क्लास आणि मास दोन्हीचं बॅकींग आहे, शिक्षकांची ती लाडकी आहे आणि आमच्या कॉलेजच्या एकशे दोन वर्षाच्या इतिहासात एक मुलगी जी आर कधीच झाली नाहीये. (तिच्या समोर येतो.)*

*उर्वशी: मला नाही रहायचं.*

*रोहीत: (जवळ जात) तूच म्हणली होतीस ना? त्यांच्या दादागिरी विरुध्द बोलत रहाणार. हिरोला दाखवणार. मग आता जर ते निवडून आले तर आख्ख्या कॉलेजला त्यांची दादागिरी सहन करायला लागणार. बेंचला च्युंइग गम लावला, गाडीला स्क्रॅच मारला, पेट्रोलच्या टाकीत साखर टाकली, कॉलेज बंद पाडलं हवं तेव्हा, सगळं सहन करायचं.*

*उर्वशी: फक्त निगेटिव्ह काम नाही करत ते.*

*रोहीत: कम ऑन उर्वशी. हॉस्टेलच्या फालतू पोरांना पाच पन्नास रुपये दिले हे जर काम असेल तर डिस्कशनच करायला नको.*

*उर्वशी: नकोच. मला यात पडायचंच नाहीये.*

*उ. वडील: कारण सांग. (उर्वशी गप्प) नाही तू म्हणली हॉस्टेलवर राहयचं, राहू दिलं, डान्सला जायचं जाऊ दिलं. गाडी दिली तुला दिमतीला. सगळं केलं. आता एकतर उभं रहायचं नाहीतर आज सगळं आवरायचं आणि वाईला चलायचं आमच्याबरोबर.*

*रोहीत: चेंज आणायचा असेल ना तर तो आपल्यापासनं सुरु करायला पाहीजे. आणि मला कॉन्फीडन्स आहे या इलेक्शनमध्ये तो तुझ्यातही होईल आणि कॉलेजमध्येही.*

*उ. वडील: हुशार आहेस तू. पटकन शिकलास.*

*रोहीत: स्विमर आहे. कुठल्याही पाण्यात पडलो की पहीले पोहायचं कसं ते शिकतो.*

उर्वशी त्यांच्याकडे पहात रहाते. रोहीत शांतपणे पहाताना दिसतो.

33B. Ext/ Garden/ Noon

आता सत्या समोर उभा आहे. चिडलेलाच आहे. उर्वशी त्याला समजावतेय.

*उर्वशी: केलंय उभ मला. पण मी कशी निवडून येईन तुझ्या अगेन्स्ट? पडले की संपलं.*

*सत्या: एवढं सोप्प नाहीये, मोठा गेम प्लॅन आहे. तुला नाही कळणार.*

*उर्वशी: मला एवढचं कळतं, आपलं प्रेम इलेक्शनच्या पलिकडचं आहे, या फालतू गोष्टीमुळे त्याच्यावर*

*काहीही परिणाम होणार नाही.*

*सत्याः हे तुझ्यासाठी फालतू असेल माझ्यासाठी नाही. मी एकेक माणूस जोडून इथपर्यंत आलोय. कुणाच्या मेहरबानी मुळे नाही.*

ती रागाने पहाते.

*सत्याः राग देऊ नको. मी खरं बोलतोय. काहीही झालं तरी इलेक्शन मी माझ्या पध्दतीनं लढणारे. मला जिंकायचंय आणि त्याच्यासाठी जे जे करायला लागेल ते मी करीन. मग समोर तू असो नाहीतर स्विमर.*

गॉगल घालतो. समोर पहातो. अनिरुध्द लांब चालत जाताना दिसतो. सत्या तो चाललाय तिकडे पहात रहातो.

## 34. Int/ Yuvashakti hall/ Night

रात्री चहाचे कप मधोमध रिकामे दिसतात. युवाशक्तीच्या हॉलवर सगळी मुलं जमून तयारी सुरु करतायत. मागे टेपवर गाणी चालू आहेत. टयूब मिणमिणतीये.

*सत्याः बॅनर गेले का रे प्रिंटीगला? आणि पोस्टर? टयूबला मार रे जरा.*

एक जण टयूब ला धक्का मारतो. टयूब पेटते.

*ससाः (सरसावत) सत्या ऐक! सत्या, कॉलेजच्या खाणीतला एक हिरा. आपल्या कॉलेजसाठी ज्यांनी रक्त सांडलं, हाल अपेष्टा भोगल्या, प्रसंगी प्राणांचीही पर्वा केली नाही असा झुंजार देशभक्त तरुण!*

*अमितः ए गपे, हे वाचल तरं वाटेल उदया सत्याला फाशी देणारेत. (सगळे हसतात.) इलेक्शनला कशी गाणी पाहीजेत! आमच्या गावाकड असतात पंचायतीच्या इलेक्शनला. बस एक सनम चाहीये च्या चालीवर, कॉलेजला यायला पाहीजे, अहो नॉलेजसाठी. बस एक सत्या पाहीजे...*

*सगळेः आख्ख्या कॉलेजसाठी! टी टींग टी टींग (टाळया मारतात)*

*अमितः किंवा चल दोस्ता, यारा, भाऊ, सगळे हे ध्यानात ठेऊ, युवाशक्ती आपली पार्टी, चल सत्याला मत देऊ, चल सत्याला मत देऊ! (मागे कोरस धरला जातो. पब्लिक नाचायला लागत. सत्या हसायला लागतो. समोर पहातो अप्पू चाललीये.)*

*सत्याः (हाक मारतो.) अप्पू! (ती थांबते. तो उठून बाहेर जातो. अंधाऱ्या हॉलमधनं ती एकटी ऑकवर्ड बाहेर उभी आहे.)*

34a. Ext/ hostel road/ Night

सत्या बाहेर येतो. हॉस्टेलच्या बाहेर दोघंच उभे.

*सत्याः काय गं कुठाय दिवसभर?*

*अप्पूः जरा नोटस घ्यायला गेले होते आणि आज बाबा पण आले होते भेटायला, जरा अभ्यास मागं पडलाय तर तो कम्प्लिट करते.*

*सत्याः बच्चन देऊ नको. चल व्हॅनिला आईस्क्रीम खाऊन यू.*

*अप्पूः आत्ता जस्ट जेवले. मी जाते.*

निघून जायला लागते. सत्या हात धरतो.

*सत्याः मी मेले आणि समोर तू व्हॅनिला आईस्क्रीम घेऊन आलास तर उठून येईल असं बोलली होतीस एकदा. आठवतंय ना?*

*अप्पूः अरे तू असा गैरसमज...*

तिला जवळ धरतो.

*सत्याः तुला माझ्यावर नाही चिडता येत, माहीतीये मला.*

*अप्पूः तोच तर प्रॉब्लेम आहे माझा. ज्याच्यामुळे त्रास होतो, त्यालाच जीव लावून बसते.*

डोळयात पाणी तरळत. दोघं एकमेकांना कडकडून मिठी मारतात. बाहेरच्या पिवळया प्रकाशात दोघांनी एकमेकांना कडकडून मिठी मारलेली दिसते.

*अप्पूः उदया किती वाजता पहिली सभा आहे?*

35. Int/ FYBA classroom/ Day

वर्गात फळयावर दुसरं महायुध्द असं लिहीलेलं दिसतं. त्याच्या पुढे रोहीत उभा.

*रोहीतः हॅलो. स्टुडंट फोरम बददल माहीती सांगायला आलोय. इलेक्शन साठी.*

काही मुलं उठून निघून जातात. रोहीत एकदम कमी झालेल्या संख्येकडे पहातो.

*रोहीतः आपल्याला सगळं आजचं पाहीजे. कपडे, गाडया, गॅजेटस, आता तर कॉम्प्युटर सारखी क्रांती आपल्या देशात येतीये. मग या सगळयात आपलं कॉलेज जुनं का असावं? जिथं बेसिक सुविधा नाहीत, नळाला पाणी नाही, चांगली लेडीज रुम नाही, स्विमिंगपूल नीट साफ केला जात नाही. पंख्यांची कमळं झालीयेत. लायब्रीत मुलं झोपतात.*

*१ः हा लायब्ररीचा प्रॉब्लेम नाहीये.*

*रोहीतः तिथलं वातावरण पाहीलं तर झोपचं येईल. छोटया छोटया गोष्टी आहेत ज्या स्टुडंट फोरम बदलेल. पहिला बदल हा आम्ही एका मुलीला संधी देऊन केलाच आहे. तीच उर्वशी आता तुमच्याशी बोलेल. (ती बाहेर पहातेय. तिच्या हातात कागद दिला जातो. ती भानावर येते, कागद घेते.)*

*उर्वशीः हॅलो. स्टुडंट फोरम पुण्यात तीस पैकी सत्तावीस निवडणुका जिंकलं आहे. आम्ही सँडपीट आणि जिम्स बनवली आहेत, कल्चरल इव्हेंटसची बजेटस वाढवली आहेत, कॉपी मुक्त परिक्षा केलं आहे.*

*२ः पास व्हायचे वांदे! (सगळे हसतात.)*

*उर्वशीः ते ही खरचं आहे. खरंतर एटीकेटी सगळीकडे असायला पाहीजे. (सगळे पुन्हा हसतात. रोहीत तिच्याकडं रागानी पहातो.) सॉरी. तर आता आपला लाडका अनिरुध्द आमचं गाणं सादर करेल. हे सगळयांनी म्हणायचंय.*

*अनिरुध्दः (उभा रहातो.) हॅलो. अं... जिसमे है हिम्मत, और जज्बा, बदलनेका हर कदम, जिसमे अच्छाई और सच्चाई का है अनोखा दम, जिसके आगे लगते बाकी सब पानी कम, वो है...(अचानक सत्याला समोर पहातो.सत्या त्याच्या स्टाईलनी त्याला बोलवतो.) बाजीगर ओ बाजीगर, तू है बडा जादूगर! (सगळे जोरजोरात हसायला लागतात. अनिरुध्द वर्गाबाहेर पळत सुटतो. बाहेर येतो आणि त्याची रपकन गचंडी धरली जाते.)*

35A. Ext/ College locations/ Day

सत्या त्याला जिन्यावरनं धरत धरत वर आणतो. ऑफीसमधनं पुढे आणून कॉलेजच्या माईकपाशी उभा करतो.

*अनिरुध्दः च्यायला हे बरंय. तुमचं आपलं दिनमे अपोझ रातमे प्रपोझ चालू आहे. आणि मी गायचं पण नाही? ती माझी पण मैत्रीण आहे आता. आणि तसही माझा त्या इलेक्शनशी काही संबंध नाही. मी मजा म्हणून गातोय.*

*सत्याः गा तू. मग एकतर ती किंवा मी. तू ठरव. (निघतो.)*

*अनिरुध्दः आला ना राग? तू वेडा आहेस का सत्या आपलं सोडून कसं कुठे गाईन मी? आणि बघीतलं एक सभा त्यांना नीट घेता आली नाही.*

*सत्याः हल्ली कोण कधी फिरेल सांगता येत नाही. आणि तू काल बागेत काय करत होता रे?*

*अनिरुध्दः बर्ड वॉचिंग!*

*सत्याः सांगतो का लाथ घालू आता?*

*अनिरुध्दः अरे दर दुपारी मी जाऊन बसतो बागेत भीक मागायला. गाणी गातो. मस्त धंदा होतो.*

सत्या त्याला टप्पल मारतो. अनिरुध्द माईक समोर घेतो.

*अनिरुध्दः ऐक! आपल्यासाठी खासं गाणं केलंय. चल तेरी लाईफ बना देता हूँ!*

सत्या हसायला लागतो. अनिरुध्द गाणं गायला सुरु करतो.

**SONG 4 STARTS**

A.Ext/ Various locations/ Day Night

खिडक्यांवर झेंडे लागतात. भिंतींवर पोस्टर्स लागतात. कुठे उर्वशीला टिकली लावलीये. कुठे रोहीतला गॉगल काढलाय. कुठे सत्याला टिळा लावलाय. उर्वशी बघून हसतेय.

B.Ext/ Student Forum office/ Day

रोहीत एम जे आणि आणखीच चार पाच जण पॅम्प्लेटस देतायत. त्यांच्यासमोर मुलांचा जत्था युवाशक्तीच्या घोषणा देत बाहेर पडतोय. रोहीत त्याच्याकडे पहात राहीलाय. ते मधोमध अडकलेत.

C.Int/ SASA home/midnight

ससा घरी झोपलाय झोपेत घोषणा देतो. आई वडील दचकून जागे होतात.

D.Ext/ restaurant/Noon

स्टुडंट फोरमची पॅम्प्लेटस वाटली जातात. सत्या एक पॅम्पलेट घेतो. वळवतो. मागे पिक्चरची तिकीटं चिकटवलेली दिसतात. फाडून टाकतो.

E.Ext/ Canteen Backside/Noon

बन्या बापूंकडे लोकांची गर्दी आहे. कॅण्टीन च्या मागच्या बाजूला सटटा खेळला जाताना दिसतो. सत्यावर पैसे लावले जातात.

F.Ext/ College Premise/Noon

उर्वशी आणि सत्या दोघेही लोकांच्या घोळक्यात आहेत. ती लांबूनच सत्याकडे पाहून हसते. सत्या न हसता दुसरीकडे बघतो.

G.Ext/ Yuvashakti Hall outside/ Night

अमित रात्री बसून हिशोब करतोय. शेजारी पाठीला पाठ लावून अप्पू बसलीये ती सगळया मुलींना दयायला पॅम्प्लेटस तयार करतीये. सत्या दोघांच्या डोक्यावरनं हात फिरवून जातो. दोघं पहातात.

H.Int/ Yuvashakti Hall/ Night

अनिरुध्द ऑफीसमध्येच झोपलाय, त्याला पांघरुण घालतो. आई बाहेरनं पहाते.

I.Ext/ College Gate/ Day

सकाळी कॉलेजच्या गेटपाशी  दोन ओम्नी आलेल्या दिसतात. सत्या जवळ जातो. दार उघडतात. आत खूप सारी हत्यारं सत्याला तिथं जाताना उर्वशी पहाते. तिचा डोळयांवर विश्वास बसत नाहीये. सत्याला दोन तलवारी दिल्या जातात. ती निघते. इकडे सत्या तलवारी परत देतो आणि म्हणतो गरज नाही. उतरतो. गाडया निघून जातात.

J.Int/ Classroom/ Day

उर्वशी पुन्हा एकदा मुलांसमोर उभी. रोहीत कागद देतो. ती नको म्हणते तशीच बोलायला लागते.

K.EXt/ YUVASAHAKTI OFFICE/ Day

चहा वर चहा भरले जातात. कागद उघडला जातो. पंचवीस वडापाव रपारप संपतात.

L.EXt/ College porch/ Day

ससा पथनाटयात जीव ओतून अभिनय करताना दिसतो. पथनाटय रंगात येतं, इतक्यात वरुन टपाटप अंडी फेकली जातात. सगळा बटयाबोळ होतो. लोकं हसायला लागतात.

**SONG ENDS**

36. Ext/ Canteen/ Day

कॅण्टीनवाला येऊन चहा देतो. अप्पू चहा घेते. आजूबाजूला अंडी लागलेली टिम उभी.

*अप्पूः अंडयातनं बाहेर नाही आले आणि अंडी फेकायला सुरुवात? आता बघा जलवा.*

समोरनं घोषणा देत उर्वशी आणि स्टुडंट फोरम ची टिम जाताना दिसते.

37. Ext/ Hostel Road/ Night

रात्री हॉस्टेलच्या बाहेर खुर्ची टाकलीये. टाकेश त्यावर बसून कोणाशी तरी बोलतोय.

*टाकेशः किती वाजले? आँ? घर? बायको? आँ काय आहे का नाही?*

समोर कुत्र उभं दिसतं. त्याच्या शेजारनं काही पोरं डोक्यावर फडकी टाकून निघून जातात. भिंतीवर पोस्टर लावलेलं दिसतं. उर्वशीचा चेहरा. खाली कॉलेजचा डाव, वासनेची हाव, उर्वशी निंबाळकर. मी नाही त्यातली, कडी लावा आतली.  हीच पोस्टर जिन्याशेजारी दिसतात. पार्कींगमध्ये दिसतात. नोटीसबोर्डवर दिसतात.

*38.* Ext/ college stairs/ Day

असंच पोस्टर आता सकाळी कॅण्टीनमध्ये दिसतं. समोर हा घोळका दिसतो. उर्वशी गर्दी कापत येते. पहाते. प्रचंड चिडते. वळते. गर्दी कापत तशीच चालत चालत कॅण्टीनमध्ये युवाशक्तीच्या कटटयासमोर येते. बेंचवर सगळे बसलेत. सगळे ती आलेली पहातात. सत्या वर पहातो.

*उर्वशीः आलात ना लायकीवर?*

*सत्याः आम्ही? स्वतः आधी पिक्चरची तिकीट वाटणार, लोकांच्या गाडया फुल करणार, मग आमच्यावरच अंडी फेकणार, आणि स्वतःच पोस्टर्स लावणार. तुला वाटलं मी हे करीन? कमाल आहे!*

*उर्वशीः तूच म्हणला नव्हतास का? इलेक्शन मी माझ्या पध्दतीन लढवणारे. असू शकते तुझी पध्दत. (ससाकडे पहात) तू नाही तर तुझे भक्त! दुसरं कोण? तुमच्यापैकी कोणी सापडू नये. मी वाट लावून ठेवीन.*

*सत्याः आता तर तू शोधून दाखवच. आपलं ओपन चॅलेंज आहे.*

*उर्वशीः चला, सभेला उशीर होतोय.*

*सत्याः जा जा, आख्खी युनिव्हर्सिटीच येणारे तुझे मौलिक विचार ऐकायला.*

दोघं समोरासमोर उभे आहेत. ती निघून जाते.

*सत्याः अप्पू कुठाय रे?*

*घटटः ऑफीस.*

सत्या उठतो. सगळे धपाधप तिथून निघतात. बेंच रिकामा दिसतो. मागून एम जे पहातो.

38A.Ext-int/ Yuvashakti Office/ Day

युवाशक्तीच्या ऑफीसच्या दारापाशी जोरात सत्या चालत येतो. अनिरुध्द अमित आणि अप्पू बाहेर पडतायत. शेजारी टाकेश येऊन थांबलाय.

*सत्याः अक्कल आहे का तुला? कशाला पोस्टर लावली?*

*अमितः (वर पहातो.) तिनी नाही केलेलं, मी तिला काल संध्याकाळीच थांबवलं होतं.*

*सत्याः मग?*

*टाकेशः मी सांगू का? पोस्टर कुणी लावली?*

*अप्पूः तू स्वतः लावली का नाही तुला कळत नाही, पोस्टर कुणी लावली कुठनं कळणार?*

*टाकेशः भोसलेची पोरं आली होती रात्री.*

*सत्याः हे खरं असेल तर स्विमर मेला. (रागाने.) चला.*

*अनिरुध्दः झालं. तुला तर एक हाणामारीला कारणच पाहीजे. साध पोस्टर लावलंय ना.*

*सत्याः (तापत) साध पोस्टर? मला बरोब्बर माहीतेय त्यानी का केलंय हे. मी त्याला नाही सोडणार.*

*अनिरुध्दः जा, तू काहीतरी शेखचिल्लीगिरी करशीलच मला गॅरंटी आहे. (दुसऱ्याला) किती वेळा सांगितलं रे हयाला तरी माठ असल्यासारखा हाणामाऱ्या...*

सत्या रपकन गचंडी धरतो.

*सत्याः डोक्यावर बसवलंय ना, तर कानात नाही मुतायचं. परत एक शब्द बोलला ना मध्ये, कुत्र्याच्या आईगत मारीन.*

*अनिरुध्दः तू मार मला, पण मला हे पटत नाहीये. आणि मी बोलणार.*

*सत्याः बाहेर हो चल. (सगळे अवाक. सत्या ओरडतो.) हो बाहेर.*

*अनिरुध्दः सत्या टेम्पर.*

*सत्याः गाढवाच्या टांगेत घाल ते टेंपर. चला रे आज स्विमरला बुडवतो कायमचा.*

सगळे धाडधाड करत त्याच्या मागनं निघून जातात. अनिरुध्द पहात रहातो. सगळे कोपऱ्यावर वळतात. दुसरीकडनं रोहीत एम जे हे पाहून निघतात. रोहीत एम जे ला खूण करतो. एम जे पळत जातो. रोहीत पार्कींग पाशी वळतो.

38B.Ext / Parking Lot/ Day

पार्कींगमध्ये रोहीत त्याची गाडी काढतोय. आत जाऊन बसतो. मागे सगळं इलेक्शनचं मटेरिअल ठेवलेल. तो गाडी काढणार एवढयात त्याच्या काचेवर टकटक होते. तो वळून पहातो. काच खाली घेतो.

*सत्याः (खिडकीत येत.) बाहेर ये.*

रोहीत बसलेलाच आहे. गाडीच्या भोवती सगळे उभे दिसतात. सत्या दार उघडतो.

38C.Int/ Pricinple Cabin/ Day

प्रिन्सिपलच्या केबिनमधून हे सगळ दिसतं. एम जे त्यांना दाखवतोय. रोहीत गाडीतनं उतरतो. सत्या त्याला धरतो.

सत्याः (जवळ जात) *परत जर तिला मध्ये आणलं तर आईशप्पथ तुला तुझ्याच गाडीला बांधून फरफटत घेऊन जाणार मी स्विमर. ये बाहेर ये.*

रोहीत फक्त शांतपणे केबिनकडे पहातो.

*एम जेः उदयापण हे हेच करणार सर. युवाशक्ती वाले काल माझ्या घराखाली फिरत होते. आज मला उचलूनही नेतील. तुम्ही प्लीज पोलिसांना बोलवा. आत्ताच्या आत्ता. आणि यांच्यावर ॲक्शन घ्या.*

*प्रिन्सिपलः (सत्याकडे रागाने पहात फोन लावतात.) मी एम बी कॉलेजचा प्रिन्सिपल देशपांडे बोलतोय. उदया इलेक्शन्स आहेत इथं. पण दोन गटात मारामारी व्हायची शक्यता आहे. तुम्ही सिक्युरिटी पाठवा साहेब. प्लीज.*

पुन्हा तिकडे पहातात. रोहीतला आत ढकललं जातं. तो गाडीत बसतो. सगळे निघून जातात.

38D.Ext / Parking Lot/ Day

कॉलेजच्या बाहेर रोहीत गाडीत बसलाय. एम जे आत येतो.

*एम जेः सरांना कळलं. निम्म काम झालं.*

*रोहीतः (काचेत पहात) निम्म उदया करायचंय. तयार केली ना पोरं? पैसे दिले का?*

*एम जेः मघाशीच. बाहेर येतात ना पोरं. ओळख काढली त्यांच्याशी.*

रोहीत त्याच्याकडे पहातो. दोघं निघून जातात.

39.Int / Mess/ Night

रात्री मेसमध्ये सगळे जण जेवतायत. ताट दिसतायत.

*सत्याः च्यायला, आज भात वेगळा लागतोय एकदम.*

*अमितः तू पिकवलेला आहे.*

सत्या आश्चर्याने पहातो.

*अमितः कालच पाठवला आईनी. म्हणलं आज आपल्याकडनं सगळयांना. आवडला ना?*

*सत्याः (त्याच्या डोक्यावरनं हात फिरवतो. इमोशनल होतो.) आईला सांग, एकदम माझ्या आईसारखा झालाय.*

*ससाः सत्या? त्या स्विमरचं काय करायचं?*

*सत्याः तो, स्मॉल आहे रे!*

*ससाः पण तो काहीतरी राडा करणार.*

*सत्याः जे काय करायचं ते करु दे. मतदान झालं की आणखीन एक बसेल! कानाखाली.*

सगळे हसतात.

*सत्याः अण्णा भात वाढा अजून (अमितकडे बघून हसतो. सगळयांना) उदया मतदानाला या रे सगळे.*

*घटटः कोणाला काही प्रश्न? सूचना? शंका?*

40.Ext / Parking Lot/ Day

सकाळी गेटपाशी पोलिसांची जीप दिसते. तिच्या शेजारनं दोन मुलं आत येतात.

*१ः (पोलिसाला) काय मामा? काय विशेष?*

*पोलिसः तुझ्या बापाचं बारस आहे जेवायला आलोय. चल पुढं! याच्या आईच्च तंगडं.*

दंडुका हाणतात. दोघं पुढं जातात.

40A.Ext / various election shots/ Day

एका वर्गात मतदान केंद्र दिसतं. बाहेर दोन हवालदार बसलेले. आजूबाजूला सगळं गजबजलेलं. गर्दी. एकीकडे स्टुडंट फोरम आणि दुसरीकडे युवाशक्तीच्या टीम्स उभ्या. मतदान केंद्राच्या बाहेर लांबच्या लांब लाईन लागलेली. लाईन सोबत कॅमेरा आत जातो. एक एक स्टुडंट पुढे सरकतोय. एकाच्या बोटाला शाई लावली जाते. एक मुलगी ठप्पा मारते. एक मुलगा मत पेटीत टाकतो. शांतपणे एका मागून एक स्टुडंट व्होटिंग करुन बाहेर येतात. बाहेर प्रताप आणि तीन चार एन सीसी ची मुलं ही उभी आहेत.

40B.Ext / In front of election room / Day

युवाशक्तीच्या घोळक्यामध्ये अप्पू येते.

*अप्पूः अरे काय च्यायला. हिनाचा बाप आलाय दाखला काढायला.*

ग्रुप मध्ये सगळे अचंबित.

*सत्याः काय?*

*अप्पूः हो ना. बदली झाली म्हणे. डायरेक्ट परवा जाणार औरंगाबादला.आणि ती पण नाही आली आज. वडील म्हणले आता येणारच नाही.*

*सत्याः तिच्या बापाचा स्क्रूढिल्लाच आहे पयल्यापासनं. सोडं.*

चहाचे कप ठेवले जातात. सगळे उचलतात.

41.Int / Toilet/ Noon

टॉयलेटची कम्पार्टमेंटस दिसतात. दोन जण चालत येतात. उभे रहातात. त्यातला एक मनोज. एम जे.

*एम जेः मैं गया था ना घरपे. उसके पिताजीने पचास हजार दिये हात मे. बोले ये इलेक्शन जितना मंगता है. रोहीत म्हणला शब्द देतो. शब्द दिला पण त्याला सुचत नव्हतं, मीच आयडिआ दिली. म्हणलं सात आठ बारा आणि चौदा. लाव गपचूप डबल वोटिंग करायला. पर स्टुडंट पाचशे. तू केलं का? आणि बाबा कोणाला बोलू नको नाहीतर एवढ सगळं केलेलं बोंबलेलं.*

*२ः आपल्यावर विश्वास नाही का?*

*मनोजः जा आता चल!!*

दोघं निघून जातात. चार कम्पार्टमेंट पलिकडनं अमित उभा रहातो. प्रचंड चिडलेला.

42.Int / Yuvashakti Room/Noon

धाडकन युवाशक्तीचं दार उघडतं. अमित आत येतो. सत्या वगैरे सगळे समोर बसलेले.

*अमितः सत्या स्टुडंट फोरम वाल्यानी मोठी गेम टाकलीये आपल्यावर. मी आत्ता ऐकल एम जे ला बोलताना की सात आठ बारा चौदा मध्ये डबल वोटींग केलंय. त्याना माहीतेय आपण कन्फर्म जिंकणार. म्हणून उर्वशीच्या वडलांनीच पैशे वाटून करवलंय हे. (सत्या चिडून उठतो.) सत्या आपण काहीतरी करायला पाहीजे.*

सत्या उठून उभा रहातो.

*घटटः आता बास. दोन फनकावून पण याला अक्कल नाही आली. भोसलेनी काशी करायची आणि आपण गप्प बसायचं असं काय सिलॅबस मध्ये लिहीलंय का? चला घ्यू त्याची आज.*

*सत्याः त्याला हेच पाहीजे की आपण चिडावं. राडा करावा. आज तसं काही करायचं नाही.*

*अप्पूः करेक्ट (त्याच्याकडे पहात)*

*सत्याः या डबल वोटींगचं काय करायचं?*

*अप्पूः एक मिनिट. माझ्याकडे एक आयडिआ आहे. बाहेर चल.*

तिघं बाहेर येतात.

42A.Ext / Yuvashakti Room/Noon

दार उघडतं सत्या अप्पू अमित बाहेर येतात. इकडे तिकडे पहाते. बाहेर अनिरुध्द दारापाशीच उभा. सत्या रागाने पहातो.

*अनिरुध्दः मला तुझ्याशी बोलायचंय जरा. इकडं ये ना.*

*सत्याः माहीतीयेत मला तुझे स्टंट! जा! मला वेळ नाही आत्ता. उदया ये.*

*अनिरुध्दः सत्या खरंच बोलायचंय यार. मस्करी नाही करते.*

*सत्याः एक दिवस भेटला नाहीस तर काय जीव जाईल का तुझा? जा ना.*

अनिरुध्द हिरमुसून पहातो. निघून जातो.

*अप्पूः हां तर प्लॅन असा आहे... मी लॅब मधनं क्लोरोफार्म मिळवते. आर्ट वाल्या दोन पोरींना गपचूप बसवते. सेम मत तयार करतील. आपण दोघं घ्यून जाऊ रात्री, बरोब्बर साडे नऊला हॉस्टेलचं गेट.*

43.Ext / College shots- hostel/ night

रात्री जोरदार पाऊस पडताना दिसतो. कॉलेजवर, हॉस्टेलवर, वेगवेगळया ठिकाणी. बॅनर्स, पोस्टर्स सगळं भिजलेलं आहे. हॉस्टेलच्या गेट खाली सत्या आणि अप्पू एकत्र दिसतात.

*अप्पूः पोलिस आठ वाजताच गेलेत. कदम झोपलाय. किल्ल्या मिळाल्यात. ती मतं काढायची आणि ही टाकायची.*

*सत्याः कदम जागा झाला तर?*

*अप्पूः क्लोरोफॉर्म आणलाय ना केमिस्ट्रीच्या लॅब मधनं धर. (त्याला क्लोरोफॉर्म देते.)*

सत्या तिचा हात धरतो. ती सत्याकडे पहाते. वीज चमकते. आवाज येतो.

44.Int / College office/ night

ऑफीसचं कुलूप उघडलं जातं. सात आठ बारा चौदा बॅलेट बॉक्स दिसतात. सात उघडला जातो. इतक्यात जिन्यावरनं काही माणसं वर चढत असल्याचा आवाज येतो. ती खिडकीमधनां पहाते. दहा बारा जण पळत येताना दिसतात.

*अप्पूः (सत्याचा हात धरते.) सत्या... चल!*

दोघं उठतात आणि पळत सुटतात. कोपऱ्यात अप्पू ठेचकाळते. दोघं ऑफीस बाहेर पडतात.

44A.Ext / College premise/night

जिन्यावरुन खाली येतात.

*सत्याः बॅक गेट. बॅक गेट!*

दोघांचा हात सुटतो. दोघं दोन वेगळया दिशांना पळत सुटतात. सत्या पळत पळत येऊन एका भिंतीआड लपतो. शेजारनं चार पाच पोरं पळत जातात. त्यांच्या हातात हत्यारं आहेत. त्याला लांब एका लाईटखाली उभा रोहीत दिसतो. हातात छत्री धरलेली आहे.

44B.Ext / College lobby/ night

रोहीत समोर चार जण उभे आहेत. त्यातला एक ज्याने उर्वशीबददल सत्याकडनं मार खाल्लाय.

*रोहीतः तिला सोडून दया. पण त्याला आज नाही सोडायचं. आपल्या ताब्यात घ्या. गोडाऊनला ठेवू बांधून. उदया रिझल्ट लागला की त्याला गाडीच्या मागे बांधून फरफटत घेऊन जाणार मी हॉस्टेलला.*

सगळे निघतात. रोहीत आणि एम जे दिसतात. एमजे त्याच्या खांदयावर हात ठेवतो. रोहीत त्याच्याकडे पहातो.

*रोहीतः थॅंक्स संध्याकाळभर त्यांच्या मागावर राहीलास.*

त्याच्या खांदयावर हात ठेवतो.

44C.Ext / near College back gate/ night

सत्या पळतोय. भिंतीच्या आड येतो. तिथून सरकत सरकत वळतो. समोर कोणीतरी येतं. त्याला लाथ घालतो. पुढे पळतो.

44D.Ext / College Front Gate/ night

कॉलेजचं गेट हळूच उघडतं. भर पावसात अप्पू बाहेर येते. रस्ता क्रॉस करते. भेदरलेली. चालत निघते.

45.Ext / Hostel Corridor/ night

रात्री हॉस्टेलचा फोन वाजतो. सत्या उचलतो. पूर्ण ओला आहे.

*सत्याः पोचलो.*

*अप्पूः सत्या. काळजी घे.*

सत्या फोन ठेवतो. पिवळया लाईटमध्ये हॉस्टेलच्या कॉरीडॉरच्या बाकावर सत्या शांतपणे बसलेला दिसतो. चेहऱ्यावरनं हात फिरवतो. तसाच बसून रहातो. त्याच्या बाहयांमधनं पाणी आणि रक्त निथळताना दिसतं.

46.Ext-int / porch cabin/ Day

सकाळी  घंटेचा टण टण टण आवाज ऐकू येतो. मोजणी ऑफीसच्या बाहेर ही गर्दी जमलेली. कुलूप उघडलं जातं. रोहीत उर्वशी, सत्या आणि युवाशक्तीची टीम आत जातात. सोबत एकदोन सर आणि बन्याबापू.
आत उर्वशी रोहीत एका बाजूला उभे आहेत. दुसऱ्या बाजूला सत्या आणि युवाशक्तीची टीम. समोर सात आठ बारा चौदा दार बंद केलं जातं.

*सत्याः फक्त बोगस वोटींगच नाही. माझ्यावर अटॅक केलाय यानी काल रात्री.*

*रोहीतः प्रुफ आहे?*

*सत्याः बाहेर ये तुला प्रुफ दाखवतो.*

*प्रिन्सिपलः शांतपणे उभे रहा, मला चेक करु दया.*

प्रिन्सिपल तिथपर्यंत जातात. मध्येच थांबतात. खाली वाकून एक पिशवी उचलतात. त्यातनं युवाशक्तीची मत बाहेर काढतात.

*प्रिन्सिपलः हे काय आहे?*

*रोहीतः युवाशक्ती!*

बन्या बापू पेटया खाली काढतात. प्रिन्सिपल चेक करतात. शिक्षक रपारप मोजतात.

*सरः तेवढीच आहेत. डबल वोटींग नाहीये.*

*रोहीतः (सत्याला) हॅपी? का परत एकदा करायला सांगू?*

*प्रिन्सिपलः बाहेर जा सगळे. निकाल दुपारी जाहीर होईल.*

*सत्याः स्विमर डबलगेम केलीस तू. आजिबात बाहेर पडू नको इथनं.*

*उर्वशीः सर तुमच्या समोर धमकी देतोय हा.*

*रोहीतः त्याचा प्रॉब्लेम नाहीये. दुसरं काय करणार तो त्या शिवाय. आणि सगळे नुसते बघत बसणार.*

तो बोलायच्या आधीच सत्या त्याला धरतो आणि बाहेर ढकलतो. दार ढकलून रोहीत बाहेर पडतो. बाहेर गर्दीत रोहीत ढकलला गेलाय. पोर्चमध्ये ही गर्दी जमलेली. सत्या त्याला मध्ये घेऊन एकामागून एक गुददे घालतो. रोहीत हेलपाटत उठतो. त्याला आजूबाजूला लोकं जमलीयेत हे लक्षात येतं. तो पहातो आणि प्रतिकारच करत नाही. मुददाम मार खायला लागतो. मार खाता खाता प्रत्येक शिक्षकाकडे पहातोय. सत्या त्याला जिन्यावरनं खाली ढकलतो. रोहीत हेलपाटत खाली येतो. पडतो. सत्या त्याला फरफटत कॉरीडॉर मध्ये आणतो. रोहीत

पडून प्रिन्सिपल कडे पहातो. ते सैरभैर होतात. सत्या लाथ घालतो तो आणखी जोरात कळवळतो. एवढयात ससा पळत पळत येतो आणि सत्याला हॉकी स्टीक देतो.

*ससाः फोडून टाक ज्या डोक्यातनं हे आलयं.*

सत्याकडे हॉकी स्टीक टाकतो. रोहीत प्रचंड घाबरलेला. सत्या प्रचंड पेटलेला. ती हॉकी स्टीक घेतो. त्याला मारायला वर उगारणार एवढयात जीवाच्या आकांतानं ओरडणाऱ्या अमितचा आवाज येतो. तो लांबून पळत पळत येतो. गर्दी कापत सत्याजवळ जातो. अमित सत्याला धरतो आणि ओरडतो.

*अमितः सत्या!!! अनिरुध्द गेला!!!! (सगळे सुन्न होतात.) त्याची डेडबॉडी मागच्या इलेक्ट्रीक रुम मध्ये सापडलीये !!!*

सत्याच्या हातातनं धाडकन हॉकी स्टीक खाली पडते. आख्ख्या कॉरीडॉर मध्ये स्मशान शांतता पसरते. सगळे पळतात.

47.Ext-int / Aniruddha Home/ Day

त्याच्या स्टाफक्वार्टसच्या बाहेर रांग लागलेली दिसते. घरात मध्ये अनिरुध्दची डेडबॉडी ठेवलेली आहे. कोपऱ्या मॅडम बसलेल्या.

*मॅडमः किती वेळा सांगायचे रे नको रात्री बेरात्री बाहेर फिरु. पंप विसरुन गेला आणि बरोब्बर अटॅक आला.*

*१ः इलेक्ट्रीकरुम पाशी सापडला. गुदमरुन गेला बिचारा.*

एका कोपऱ्यात युवाशक्तीचा सगळा ग्रुप सुन्न होऊन रडतोय. सत्या गुडघ्यात मान खाली घालून बसलाय. अचानक आवाज ऐकू येतो. "मला जरा बोलायचंय तुझ्याशी!" सत्या समोर पहातो. अनिरुध्द झोपलाय. समोर उर्वशी आणि रोहीत येउन पहातात. तिला ते सगळ पाहून भोवळ आल्यासारखं होतं. रोहीत तिला सावरतो. घटट एकटक अनिरुध्द कडे पहातोय.

घटटः उठ यार अन्या उठ प्लीज !! प्लीज उठ अन्या.

47A. Int / Yuvashakti Room/ Night

अनिरुध्द म्युझिकरुममध्ये झोपलेला दिसतो. घटटचा आवाज येतो. अन्या उठ नाहीतर पडी. धाडकन त्याच्या अंगावर पडतो. त्याच्यावर आणखी एकआणखी एक असे करत सगळे पडतात.

*अनिरुध्दः चेपलो रे मी!!*

सगळे हसतात. घटट आठवून रडतोय.

47B. Ext / Road/ Morning

ससा आणि अनिरुध्द रस्त्यावर उभे आहेत. ससाच्या हातात मांजर.

*ससाः मांजर का पकडायला लावली?*

*अनिरुध्दः आज मला मांजरीला आडवं जायची इच्छा आहे. बघू तिचा दिवस कसा जातो ते.*

*आत्ता कीडे नाही करणार तर कधी?*

ससा हसायला लागतो. मांजर सोडतो. अनिरुध्द आडवा जातो. ससा रडताना दिसतो.

47C. Ext / outside exam hall/ noon

एक्साम हॉलच्या बाहेर दप्तरं टाकलेली आहेत. अप्पू दप्तर टाकते. अनिरुध्द मिठी मारतो.

*अनिरुध्दः ऑल द बेस्ट, पण प्लीज नापास हो.*

अप्पू लाथ घालते. निघायला लागते.

*अनिरुध्दः दोन वर्षाचा प्रश्न आहे. एकत्र बसूना टी वाय ला. थांब ना.*

कॉरीडॉर मधे अनिरुध्द अप्पूला वर्गाबाहेर खेचताना दिसतो. ती ढकलते. तो बॅग्स वर पडतो.
अप्पू जोरजोरात रडतेय.

47D. Int / Yuvashakti Hall/ night

युवाशक्तीच्या हॉलमध्य अनिरुध्द बोलतोय.

*अनिरुध्दः हया हॉलमध्ये म्युझिकसेक्शन झालं ना, की सगळयांनी यायचं. न चुकता, न विसरता, कॉलेजचे दिवस एकदाच येतात, पण तो दिवस कॉलेज सारखंच जगायचं. याचं पोट वाढलं असेल, याला टक्लल पडलं असेल, तुला आय  मीन तुम्हाला मुलं झाली असतील, मी मोठा सिंगर झालो असेन, पण तरीही दर वर्षी एका दिवशी जमून आपण सगळयांनी लहान व्हायचं. काय? माझ्या डेटस नसतील, पण तुम्ही सेक्रेटरीशी बोलून कॉर्डीनेट करा.* समोर उर्वशी हसतेय.

47E. Int / Aniruddha Home/ Day

आता ती रडतेय. रडता रडता सत्याकडे पहाते. सत्या मान फिरवून घेतो. एवढयात मागून कोणीतरी येतं.

*१: सत्या, युवाशक्तीला डिस्क्वालिफाय केलंय. स्टुडंट फोरम जिंकलं.*

सत्या तसाच बसून आहे. काहीही रिॲक्ट होत नाही. म्युझिक फेड इन होतं.

**SONG 5**

A.Ext/ College Ground/Night

रात्री एकटा हॉस्टेलवर चालत चाललाय. मध्येच थांबतो. इकडे तिकडे घाबरुन पहातो. डोळयात पाणी येतं.

B.Int/ Hostel Room/Night

रुममध्ये येऊन दार लावतो. वळतो. तसाच मटकन खाली बसतो. रडायला लागतो. अमित उठतो. लाईट लावतो. सत्याला जवळ घेतो. सत्या रडतोच आहे. दोघांमधले डायनामिक्स पूर्ण उलटे.

C.Int/ College Grand hall/Night

कॉलेजच्या एका मोठया अलिशान हॉलमध्ये उर्वशी एका खुर्चीवर बसते. समोर सगळे शिक्षक आणि प्रतिनिधी मंडळ टाळया वाजवतंय. उर्वशीला ते कसं रिसीव्ह करायचं कळत नाहीये.

D.Int/ Rohit house/ Day

रोहीत वळतो. उर्वशीचे वडील त्याला अभिनंदन करतात. बुके देतात.

E.Int/ Rohit Garage/ Day

रोहीत कार वरचं झाकलेलं बाहेर काढतो. आत काचेवर काळ ओतलेलं दिसतं. तो स्वतःच्या हाताने पाणी मारतो.

F.Ext/ College Canteen/ Evening

घटट, स्लो ससा, अमित अप्पू सगळे कॅण्टीन समोर येतात.फक्त युवाशक्तीचा बोर्ड काढून बाजूला पडलेला. तिथे एम जे बसलेला. त्यांच्याकडे बघून हसतो.

**SONG MIDDLE OR END**

G.Int/ Yuvashakti Hall/Day

दुपारी युवाशक्तीचा हॉल दिसतो. भकास बंद. समोर फक्त तारामती तशीच आहे. एका कोपऱ्यात सत्या बसलाय. हळूच दार उघडतं. उन्हाची एक तिरीप आत येते. सत्या तिकडे पहातो. अप्पू आत येते. त्याच्याकडे पहाते. त्याच्या जवळ जाऊन बसते. त्याच्याकडे पहात.

*अप्पूः किती दिवस वाईट वाटून घेणारेस?*

*सत्याः (काहीही बोलत नाही)*

*अप्पूः बास आता. बाहेर पड सत्या.*

*सत्याः (काहीही बोलत नाही)*

*अप्पूः अनिरुध्द गेलाय याचा त्रास मलाही होतोय पण आपण बाहेर पडलं पाहीजे आणि कॉलेज इलेक्शनचं म्हणशील तर ते हारल्यानी काही होत नाही.*

*सत्याः (नकारार्थी मान डोलावतोय.)*

*अप्पूः (त्याच्या खांदयावर हात ठेवत) उठ तू, आधी बाहेर पड. बघ स्वतःकडे काय करुन घेतलंयस ते. हीच वेळ आहे. आपण सावरायला पाहीजे. पुढं जायला पाहीजे.*

*सत्याः (धीर एकवटून) कुणासाठी?*

*अप्पूः माझ्यासाठी!? मी नाहीये सत्या? सगळयात आधीपासनं तुझ्याबरोबर आहे सावलीसारखी. अरे तुला सावरायला जन्मभर तुझ्याबरोबर रहायला लागलं ना तरी राहीन सत्या. तू फक्त एकदा म्हणून तर बघ! (थांबते. बदलते. थोडी प्रॅक्टीकल होत.) ठरलं. आपण दोघं आज रात्री जरा बाहेर जाऊ. तुला बरं वाटेल. आपलं व्हॅनिला आईस्क्रीम खायचं राहीलं होतं ना?*

*सत्याः नको प्लीज .*

*अप्पूः आठ वाजता शार्प. हॉस्टेलच्या गेटवर. (थांबते.) प्लीज टांग देऊ नको. मी आयुष्यात बोलणार नाही. (बेल वाजते.) आत्ता लेक्चर आहे सायकोचं मी जाते. आठ वाजता. शार्प.*

सत्या पहात रहातो. दार बंद होतं. तो आणि तारामती दोघंच रुममध्ये. तो त्या गिटार कडे पहातो. पुन्हा एकदा मान खाली घालतो. घडयाळाचे टोल ऐकू येतात.

H.Int-Ext/ AppuRoom-Hostel oad/Night

घडयाळात रात्रीचे आठ वाजलेले दिसतात. अप्पू आरशासमोर तयार होते. बाहेर पडते. लगबगीने हॉस्टेलच्या खाली येते. बाहेर पडणार एवढयात खांदयावर हात ठेवला जातो. वळून पहाते. समोर अमित उभा आहे.

*अमितः सत्या तुझ्यासाठी हे देऊन गेलाय.*

अप्पू अधाशासारखा एन्व्हलप उघडते. चिठठी पहाते. त्यात लिहीलंय. मला माफ कर मी चालोय. मी कुणावरही प्रेम करायच्या परिस्थीतीत नाही. तू समजून घेशील अपेक्षा आहे. तुझा, सत्या. भरल्या डोळयांनी अमितकडे पहाते.

*अप्पूः (रडवेली होत) गेला तो!?*

अमितला तिला कसं समजवावं कळत नाहीये. ती मटकन खाली बसून आहे. अमितकडे पहात रहाते. रडायला लागते. अमित तिच्या खांदयावर हात ठेवतो.

## I.Int/ TYBA Classroom/ Day

एका वर्गात लेक्चर चालू आहे. सेकंड वर्ल्ड वॉरचा शेवट मित्र राष्ट्रांची माघार असं फळयावर लिहीलंय. समोर अप्पू शेजारी अमित बसलाय. ती गप्प आहे. अमित एका पानावर फुली गोळा सुरु करतो. ती त्याच्याकडे पहाते. तेवढयात बेल वाजते.

## J.Ext/ Hostel road/Night

रात्री अप्पू हॉस्टेलबाहेर एका झाडाखाली बसलीये. अमित समोर येतो. तिच्या शेजारी बसतो. पिशवीतनं व्हॅनिला आईसक्रीम काढतो. एक तिला देतो. ती त्याच्याकडे फक्त पहाते. तो नजरेनीच खा असं म्हणतो. ती त्याला मिठी मारते.

## K.Ext/Various locations/Night

शांत रात्र दिसते. पोस्टर्स लागलेल्या भिंती, नोटीस बोर्डस, वर्ग, हॉस्टेल्स, सायकल स्टँड सगळयात एक रिकामं पण भरुन राहीलंय. आता त्यातचं कॉरीडॉर दिसतोय. ज्यात आत्ताची सगळी लोक बसलेली आहेत.

**SONG END TO PRESENT**

## 48. Int/ Hostel mess/ Night

उर्वशीचा आवाज ऐकू येतो. उर्वशी प्रताप आणि अप्पू मेसमध्ये बसलेत.

*उर्वशीः अनिरुध्द गेला, त्या पाठोपाठ सत्या निघून गेला आणि संपलं सगळं. कॉलेजची रयाच गेली. मी मग यु आर ही झाले. मग परिक्षा आल्या. पास झाले. कॉलेज नावाचा चॅप्टर संपला. एक्दम मोठं झाल्याचं फीलींग आलं. कुणीतरी गर्दीत एकदम हात सोडल्यावर जसं घाबरायला होतं तसं झालं मला बाहेरच्या जगात. कारण सत्या नव्हता माझ्या सोबतीला. माझं कशातही लक्ष लागत नव्हतं, कशातही*

*मन रमत नव्हतं. काहीतरी सलत होतं आतमध्ये. पुढच्या दोन वर्षातला प्रत्येक दिवस, एक लांब आजारपण चालू आहे, असं वाटायचं. रोज सकाळी उठल्यावर आत्ता सत्या कुठे असेल काय करत असेल हेच यायचं डोक्यात. एम ए केलं मी कसंबसं पण मधल्या काळात घरात मात्र वेगळेच वारे वहायला लागले होते. रोहीतच्या आणि माझ्या घरच्यांना वाटलं की आमचं लग्न करुन दयाव. मला माहीत नव्हतं रोहीतच्या मनात नेमकं काय चाललंय. मग त्यानीच प्रश्नही विचारले आणि उत्तरही दिलं.*

## 49. Int/ Rohit Home/ Day

रोहीतच्या गळयात हार आहेत. तो उर्वशी समोर बसलाय. मागे आवाज ऐकू येतायत.

*एम जेः बारा हजार मार्जिननी झोपवला त्या शशी सातपुतेला.*

*वडीलः आता हाच हार घ्या आणि बोहल्यावर चढा. काय?*

*काकाः निंबाळकरांना पसंत आहे. का हो? (दोघं एकमेकांना टाळया देतात.)*

रोहीत तिच्याकडे पहातो.

*रोहीतः सत्या भेटला होता.*

*उर्वशीः (एकदम लगबगीने) कुठे?? (थांबते.) इथं आहे तो?*

*रोहीतः सत्या हा शब्द आल्या आल्या एकदम कॉलेजमधली झालीस तू. नव्हता भेटला.*

*उर्वशीः (जळजळीत) प्लीज. प्लीज रोहीत.*

*रोहीतः काय? तुझ्या डोळयात दिसलं आत्ता मला.*

*उर्वशीः मला भेटायचंय त्याला. माझ्यामुळे झालंय हे सगळं.*

*रोहीतः (सुस्कारा टाकत) कोणामुळेही काहीही होत नसंत. परिस्थिती जशी असते तसे रिअॅक्ट होत असतो आपण. तसेच असतो असं नाही. (वळतो भिंतीपाशी जातो. भिंतीवर लंडनची पोस्टर्स स्विमिंग स्टार्सचे फोटो.) आज अडीच वर्ष झाली कॉलेज संपून. म्हणून सांगायला हरकत नाही. तुला काय वाटतं मी पण होतो असा मुलगा जो तुझी चीप पोस्टर्स लावेल, तू जिंकावीस म्हणून बॅलेट बॉक्सचा आख्खा एपिसोड करेल, सत्याला त्या रात्री पोरं आणून पळवायचा प्लॅन करेल? पण तेव्हा तुझ्या वडलांनी सांगीतलं होतं मुलगी पडली नाही पाहीजे. त्या पोराला मारा, पळवा काय करायचं ते करा आणि मलाही सत्याला दाखवून दयायचं होतं. त्यानी मला सणसणीत मारली होती. मग मी पण मारली, फक्त गालावर नाही. इथं. पण त्या वेळेपुरती माझी रिअॅक्शन होती ती. तुझ्या बाबांनी*

*तुझ्यासाठी सांगीतलं होतं ते सगळं केलं मी.  आता कधी तो जरी भेटला तरी मी सांगीन बॉस, झालं ते झालं नो हार्ड फिलींग्स.*

उर्वशी अवाक होऊन पहातेय.

*रोहीतः असंच आहे उर्वशी शॉक होऊ नकोस. (हसतो.) काय गम्मत आहे बघ ना? आत्ता या वेळेला, लॉ ब्रॉच्या स्विमिंग पूलमध्ये छान प्रॅक्टीस करत असतो. जगातल्या सगळयात टॉप यनिव्हर्सिटीच्या स्विमिंग टीम मध्ये असतो. पण सालं नशीब पुणे महापालिकेत घेऊन आलं. धीस इज लाईफ!*

*उर्वशीः (खिन्नपणे हसते.)*

*रोहीतः मला माहीतेय तुला कधीच माझ्याशी लग्न करायचं नव्हतं. आणि मी पण कॉन्सलेशन प्राईज कधीच घेतलं नाही. अजून किती क्लॅरिटी हवीये? जा आता, शोध त्या सत्याला! तो भेटल्याशिवाय तू कधीच नॉर्मलला यायची नाहीस.*

उर्वशी उठते. त्याच्याकडे पहाते. वळते.

*रोहीतः आणि हो, बाहेर जाऊन सांग मी लग्नाला नकार दिलाय!*

ती त्याच्याकडे पहाते. ती भरल्या डोळयांनी होकार देते. त्याच्यासमोर हात जोडते. निघून जाते. जुन्या पोस्टर्सच्या भिंतीच्या बॅकग्राऊंड वर पुढे टिळा लावलेला राजकारणी रोहीत उभा दिसतो. चेहऱ्यावर छानशी स्माईल आहे. त्यावरच उर्वशीचा आवाज ओव्हरलॅप होतो.

## 50.Int/ Hostel mess/ Night

**PRESENT**

*उर्वशीः हे सगळं कळल्यावर माझं काय झालं असेल तुम्ही विचार करु शकता.*

अप्पू आणि प्रताप एकमेकांकडे पहातात.

*प्रतापः मग काय केलंस तू?*

*उर्वशीः त्या दिवसापासन फक्त सत्याला शोधत होते. वेडयासारखी. त्याच्या गावाला जाऊन आले. तेव्हा कळलं की हा अनाथ आहे. लांबचे नातेवाईकअसतात फक्त तिथे. लहानपणापासनं पुण्यातला आश्रमातच वाढलाय तो. मग कोणीतरी म्हणलं त्याला मुंबईत पाहीलं, मग मुंबईत आले, डान्स स्कूल सुरु केलं, लग्न केलं नाही म्हणून घरच्यांनी संबध तोडले माझ्याशी, पण मी त्याची वाट पहात राहीले. तो सत्या मला काल भेटला! इतक्या वर्षानी! असा! (थांबते.) फंक्शन संपलं त्याच्या रुमवर गेले. बाहेर काढलं त्याला आणि आम्ही टाकीवर गेलो.*

*अप्पूः टाकीवर का?*

*उर्वशीः वाटतं होतं. किमान जुन्या जागेत काही गोष्टी नव्यानं जुळून येतील.*

अप्पूकडे पहाते.

51.Ext/ College Taki/ Night

**LAST NIGHT**

टाकीवर सत्या आणि उर्वशी दिसतात. भिंत दिसते. उर्वशी त्याकडे पहातेय.

*उर्वशीः इथंच विटेनी लिहीलं होतं आपण बदामात आपलं नाव.*

*सत्याः प्रेमासारखचं तेही नाही टिकलं.*

*उर्वशीः माझ्यामुळे. मी कुठल्या शब्दात तुला सॉरी...*

*सत्याः कशाला स्वतःला दोष देतेयस? आपलं नशीब होतं.*

*उर्वशीः तेच बदलायचा प्रयत्न करतेय गेली कित्येक वर्ष. बदलतच नाही सत्या. तोच हॉल, तेच कॉन्सर्ट, तोच क्लास आणि तोच एकटेपणा. भरलेला सगळीकडे. सत्या. (डोळयात पाणी येतं) तेच नशीब आज इथे आलंय आणि मला वाटतंय की आता ते बदलेल. (त्याच्याकडे पहात) बदलेल ना सत्या? (तो काहीच बोलत नाही)*

*उर्वशीः तुला आठवतेय आपली पहिली आणि शेवटची भेट कशी झाली होती?*

*सत्याः नाही.*

*उर्वशीः नीटशी झालीच नव्हती. म्हणून म्हणलं तुला भेटावं, तू माफ केलंस तर पहिली आणि नाही केलसं तर शेवटची भेट तरी राहील माझ्याकडे. (दोघे डोळयात पाणी आणून एकमेकांकडे पहातायत) आता सगळं तुझ्या हातात आहे!*

*सत्याः (तिच्या जवळ जात) उर्वशी, आपण दोघेही वाट चुकलेली माणसं आहोत. एकमेकांचा हात धरुनच बाहेरचा रस्ता शोधायला लागेल.*

तिचा हात धरतो. ती गहिवरते. त्याला कडकडून मिठी मारते. दोघं कॉलेजच्या टाकीवर रात्री मिठी मारुन उभे दिसतात.

## 52.Int/ Hostel mess/ Night

**PRESENT**

*उर्वशीः (डोळयात पाणी अडलंय. तिघेही उभे आहेत.) एकच गोष्ट मला राहून राहून त्रास देतीये, की इतकं सगळं चांगलं होऊनही, मी गेल्यावर सत्यानी आत्महत्या करायचा का प्रयत्न केला?*

रडायला लागते. तिथून रडत रडत निघून जाते. अप्पू आणि प्रताप एकमेकांकडे पहात रहातात.

*प्रतापः ही जाईपर्यंत जर तो आनंदी होता तर मग त्यानी उडी का मारली? कळत नाहीये.*

तेवढयात त्याला फोन येतो. तो फोन घेतो.

*प्रतापः हां डॉक्टर? (शॉकने) काय?*

## 53.Ext/ Hostel corridor/ Night

उर्वशी कॉरीडॉरच्या एका खांबामागे उभी आहे. रडवेली. डोळे पुसते.

*उर्वशीः आपण भेटलो हे मी सांगितलं सत्या. पण याच्या पुढे काय झालं नाही सांगता आलं.*

## 54.Int/ Hostel Hall/ Night

प्रताप आणि अप्पू मेसमधून बाहेर येतात. समोर सगळे बसलेले.

*प्रतापः हां, नाही मी सांगतो सगळयांना. (फोन ठेवतो. समोर पहातो. सगळे त्याच्याकडे पहातायत.)*

अप्पूचा फोन वाजतो. अप्पू फोन घेते.

*अप्पूः हो मॅडम, कळलं आम्हाला. निघतोच आहोत.*

फोन ठेवते. सगळयांकडे पहाते. सगळे प्रचंड पॅनिक झालेत.

*प्रतापः कुणीही पॅनिक होऊ नका. पण सत्या गेलाय. खूपच कॉम्प्लीकेशन झाल्या होत्या शरीरात. आत्ता एक दहा मिनिटापूर्वी रिस्पॉन्ड करणं थांबवलं त्यानी. बहुतेक त्याचीच जगायची इच्छा नव्हती.*

एकेक जण कोसळतो. अचानक गडबड होते. सगळे उठतात. हिना रडत रडत अमितला सांगते मी वॉशरुमला जाऊन आले. रोहीतच्या डोळयात पाणी आलंय. घटट आणि ससा एकमेकांच्या खांदयाला धरतात. बाकी पण मंडळी सुन्न आहेत. पूर्ण वातावरण शांत.

*प्रतापः कॉलेजच्या आठवणीत रहाणारा दिवस आहे. एकाच्या आठवणीत जमलो, आता घरी दुसऱ्याची आठवण घेऊन जाणार. कळत नाही अजूनही की तो नक्की कसा पडला. पण एक कन्फर्म आहे. ही आत्महत्या नाही. (सगळे चरकतात.) असूच शकत नाही. मघाचपासनं तोच विचार करतोय मी आणि*

*मला राहून राहून एकच प्रश्न पडतोय. (रोहीत कडे पहातो. त्याच्या जवळ जातो.) अमितच्या गाडीवर सत्या पडला, तेव्हा अप्पू त्याच्याबरोबर होती. घटट, ससा, टाकेश, रुक्मीणी मॅडम आणि बाकी मंडळी सगळे डिनर पाशी गप्पांमध्ये रंगले होते. (रोहीतच्या खांदयावर हात ठेवतो.) या सगळयात आमदार साहेब, कोण रहातंय माहीतेय? तुम्ही आणि हिना (अचानक वळतो.) हिना कुठे गेली रे?*

*अप्पूः वॉशरुम ला.*

*प्रतापः एक मिनिट, वॉशरुम तर त्या बाजूला आहे. (काहीतरी जाणवतं) कुणीही इथनं हलू नका. मी आलोच.*

तिथून पळत सुटतो.

## 55.Ext/ College Taki/ Night

धाडकन टाकीच दार उघडतं. हिना कठडयावर चढलेली उडी मारणार, एवढयात प्रताप जाऊन तिला खेचतो. ती ओरडते. प्रतापसकट घरंगळत गच्चीवर पडते. दोन क्षण जातात. ती उठून उभी रहाते. प्रताप उभा रहातो. तिच्या जवळ जातो. हाताला धरतो. .

*प्रतापः चल!*

## 56.Int/ ICU/Night

आयसीयुचं दार उघडतं. आत सत्या आणि रुक्मीणी आहेत. हिनाला प्रताप आत आणतो. सोबत उर्वशी, अप्पू अमित, रोहीत, ससा, घटट आणि इतर. रुक्मीणी सगळयांना पाहून अवाक होते.

*प्रतापः सत्या शुध्दीवर आलाय हे सांगायला डॉक्टरांचा आणि मॅडमचा फोन आला होता. मी सगळयांशी खोटं बोललो पण त्या शिवाय खरं कळलं नसतं.*

*रुक्मीणीः काय झालंय प्रताप?*

*प्रतापः हिना सांगेल सगळं.*

हिना सत्या समोर येऊन बसते. त्याच्याकडे एकटक पहातेय.

*हिनाः सत्या, अनिरुध्दचं सिक्रेट कळलं का रे तुला कधी? सांगितलं त्यानी तुला?*

सत्या तिच्याकडे पहातोच आहे. कोणाला काहीच कळत नाहीये. अमित अप्पू कडे पहातो.

*हिनाः आमचं प्रेम होत सत्या. माझं आणि अनिरुध्दचं.* (अप्पू थक्क होऊन तोंडावर हात ठेवते.) *मला पहिल्यांदा त्यानी नाचताना पाहीलं होतं प्रॅक्टीस हॉल मध्ये... आणि लाईट गेले होते. (मागनं*

*अनिरुध्दचा आवाज येतो. मी तिला फक्त पाहीलं आणि डोळयासमोर अंधार झाला.) बोलायला लागलो, एकमेकांना आवडायला लागलो, प्रेमात पडलो. फक्त त्याला माहीत होतं, मला लिटील हार्टस आवडतात, मला हात सोडून सायकल चालवता येते, मला मॉर्निंग शोज ना पिक्चर बघायला आवडतं आणि मी गाणीही लिहीते, (उर्वशीकडे पहात) माझंच गाणं गायला होता तो रोझ डे च्या पार्टीत.*

उर्वशी थक्क होऊन पहातेय. त्यावरच टाळया शिटटयांचा आवाज ऐकू येतो.

57.Int/ Cultural hall/ Night

रोज डे कॉन्सर्टला अनिरुध्द उभा दिसतो.

*अनिरुध्दः एका फार मोठया गीतकाराचं गाण आहे ढापून वापरतोय.*

हिना कडे पहातो. ती हलके लाजते. तो गाणं सुरु करतो.

**SONG MONTAGE**

a.Ext/ Road/Day

हिना आणि तो डबलसीट जाताना दिसतात. तो मधनंच हात सोडतो. ती घाबरते. तो पुन्हा धरतो.

b.Ext int/ college hostel/Day night

हिना उर्वशीकडून पत्र घेते. स्वतःचं पत्र त्यात टाकते. अनिरुध्द ला देते. अनिरुध्द ते पत्र काढून घेतो. वरचं पत्र सत्याला देतो. ते वाचतो. त्याची पापी घेतो.

c.Ext/ Garden/Noon

सत्याने बागेत जाताना पाहीलेला अनिरुध्द चालत चालत पुढे येतो. एका झाडामागून हिना येते. तो तिला लिटील हार्टसचा हार घालतो. ती हसायला लागते. त्याला तो हार घालते. दोघं लिटील हार्टस खातात.

d.Ext/ random locations/

दोघे बॉबी खातात. मग पेप्सीकोला खातात. रस पितायत.

e.Int/ Heena Home/ Night

हिनाचे वडील फाडकन मुस्काडात ओढतात. तिला पत्र दाखवतात. तिच्या वहया फाडून टाकतात.
रात्री एकटी रडते आहे.

f.Ext/ College Corridor / Day

कॉलेजमध्ये अनिरुध्द  हिनाच्या मागे मागे बोलत चाललाय. ती ऐकत नाहीये. पुढे जात रहाते. तो पहात रहातो त्याला आश्चर्य वाटतं.

g.Int/ Aniruddha Home/ Evening

अनिरुध्दची आई त्याला पत्र दाखवते. त्यावर कोणाचही नाव नाही.  त्याच्यावर आरडाओरडा करते आणि पत्र फाडून टाकते. तो वैतागून समोर पहातो.

h.Int/ Aniruddha Home/ Evening

हिनाचे वडील सकाळी कॉलेजमध्ये प्रिन्सिपल समोर उभे आहेत. त्यांना म्हणतात दाखला काढायचाय. ट्रान्सफर होतेय.

i.Int/ Aniruddha Home/ Evening

अप्पू सत्याला निवडणुकीच्या दिवशी

*अप्पूः च्यायला हिनाचे वडील तिचा दाखला काढायला आलेत.*

अनिरुध्द सत्याला दाराच्या बाहेर

*अनिरुध्दः सत्या तुझ्याशी जरा बोलायचंय. महत्वाचं.*

सत्या त्याच्याकडे रागाने पहातो.

**SONG MONTAGE ENDS**

58.Ext/ Muslim wasti/ Morning

सकाळी टिपीकल मुस्लीम वस्ती दिसते. हिना स्वतःच्या घराच्या बाहेर पडून कोपऱ्यावर चालत येते. ती वळणार एवढयात तिला शेजारनं ओढलं जातं. अनिरुध्द सायकलवर आहे. तिला थांबवतो. ती सोडवते. तो पुन्हा धरतो.

*हिनाः परवा सकाळची बस आहे. मी चाललेय.*

*अनिरुध्दः आज रात्रीची बस आहे. आपण चाललोय.*

*हिनाः नादानी आहे ही अनिरुध्द. प्लीज नको.*

*अनिरुध्दः प्रेमात चालतं. हिना साडे नऊ वाजता कॉलेजच्या बॅक गेटला आपण भेटतोय. आपण पळून जायचंय. मला माहीत नाही.*

*हिनाः माझ्या वडलांना कळलं तर कापून टाकतील मला.*

*अनिरुध्दः हिना फक्त मी काय सांगतो ते ऐक. आज रात्री साडे नऊ वाजता. बॅकगेट. मी वाट पहातोय.*

*हिनाः (हात झटकत) नाही येणार मी.*

*अनिरुध्दः (आवेगाने) मला माहीतीये तू येशील. तेवढा वेडेपणा नक्की घेतला असशील माझ्याकडनं. थोडं धाडसं दाखवं. प्लीज ये हिना. आलीस तर तुला जे हवं ते आयुष्य जगता येईल. प्रॉमिस. आणि नाही आलीस तर ही आपली शेवटची भेट समज. मी परत तुला दिसणार नाही. (थांबतो. सायकल वळवतो.) मी किती हटटी आहे तुला माहीतेय.*

हिनाचा रडवेला चेहरा दिसत रहातो.

## 59.Int/ ICU Cabin/Night

**PRESENT**

सगळे बसलेले. तिचा व्हॉ. ओ.

*हिनाः मी जाऊ शकले नाही. त्या दिवसापासनं काल रात्री पर्यंत एवढचं समजून जगत होते की फक्त आपण गेलो नाही म्हणून हे सगळं झालं अनिरुध्द बरोबर. पण काल काहीतरी वेगळचं कळलं... अनिरुध्द अटॅक मुळे गुदमरुन मेलाच नव्हता.*

रुक्मीणी अवाक होऊन पहातेय. अप्पू अमित उर्वशी रोहीत सगळे स्तब्ध.

*हिनाः सत्यामुळे मेला होता अनिरुध्द.*

*अप्पूः (आश्चर्याने) काय? काय बोलतेयस तू?*

*रोहीतः सत्याचा आणि अनिरुध्द गेला, याचा काय संबंध?*

*ससाः इम्पॉसिबल आहे हे!*

*हिनाः नाही. मी काल फंक्शन संपताना टाकीवर गेले होते. मी आणि अनिरुध्दनी किती वेळ तिथं घालवला होता. काल तिथं जाऊन त्याच्या आठवणीत बसावसं वाटलं. मी मागच्या बाजूला आले तेव्हा पुढे सत्या आणि उर्वशी थांबले होते. तेव्हा सत्यानीच तिला सांगीतलं.*

हिना सत्याकडे पहाते. प्रताप आणि अप्पू उर्वशीकडे पहातात.

## 60.Ext/ College Taki/ Night

**LAST NIGHT (IMMIDIATE AFTER SCENE NO. 51 HAPPENS)**

टाकीवर दोघांनी मिठी मारलेलीच आहे.

*सत्याः आणि चुका सगळयांकडनंच होतात, माझ्याकडनंही झाल्या. तू एकटीच चुकलेली नाहीयेस. मी तर रागाच्या भरात माणसं गमावली, तोडली, आणि अनिरुध्दचं झालं माझ्या हातनं, ते नव्हत व्हायला पाहीजे.*

*उर्वशीः म्हणजे?*

*सत्याः माझ्यामुळे गेलाय अनिरुध्द. इलेक्शनचे बॅलेट बॉक्स बदलायच्या रात्री मी आणि अप्पू रोहीतच्या पोरांपासनं वाचण्यासाठी पळत होतो.*

मागे हिना अचानक थांबून ते ऐकते.

*सत्याचा आवाजः त्यांच्या पासनं वाचण्याकरता मी पळत पळत निघालो, कॉलेजच्या बॅक गेट कडे.*

## 60A. Ext/ College premise/ Night

सत्या एकाला लाथ घालून बॅक गेट कडे पळताना दिसतो. एकजण आडवा येतो. सत्या त्याला बुक्की मारतो. आणि इलेक्ट्रीकरुममध्ये जाऊन लपतो. अनिरुध्द बॅक गेट पाशी उभा आहे. त्याला काही लोकं आत पळताना दिसतात. तो चक्रावून पहातो. आत पळत जातो. इलेक्ट्रीक रुमचं दार उघडतो. त्याक्षणी त्याला सत्या धरतो क्लोरोफॉर्म लावतो. आणि पाडतो. बाहेर येतो. कडी लावतो आणि पळत सुटतो.

## 60B. Ext/ College premise/ Night

टाकीवर हिना उभी आहे. रागानं पेटलेली.

*सत्याः आजही भेटून मॅडमना सॉरी म्हणायच होतं पण त्यांच्या चेहऱ्याकडे बघून धाडसंच झालं नाही गं.*

*उर्वशीः आपण जाऊया त्यांच्याकडे. बोलूया त्यांच्याशी. त्या नक्की तुला माफ करतील. मी निघते. अमित आणि अप्पू येतायत ना. मी जाते आत्ता.*

तिथून निघून जाते. सत्या एकटाच उभा आहे. समोर पसरलेल्या कॉलेज कडे पहातो.

*सत्याः अन्या कुठनं तरी ये यार, दोन मिनटं तरी भेटून जा.*

मागून हिना चालत येते.

*हिनाः सत्या?*

*सत्याः (फॉर्मल बदलत) अरे, तू पण आलीस? तुला पण सांगितलं का अमित अप्पू नी. ये ये. ते येतीलच.*

त्याच्या जवळ जाते. डोळयात संताप, तिडीक आणि पाणी.

*हिनाः तुला एक सेकंद पण बघता आलं नाही की ज्याला आपण मारतोय तो आपला मित्र आहे.*

*सत्याः हिना, तसं नाहीये. ते सगळं इतक्या गडबडीत...*

*हिनाः का केलसं तू सत्या हे? (जोरात ओरडत) का केलसं?*

त्याच रागात अनावधानाने चिडून त्याला पुश करते. खालनं गाडी येताना दिसते. तो कोलमडतो. तसाच खाली पडतो. धाडकन गाडीवर आपटतो. वरुन हिना ते पहाते अमित अप्पू जोरात ओरडतात. हिना पळत सुटते.

## 61. Int/ Icu Cabin/ Night

रुम मधला प्रत्येक जण सुन्न आहे. हिनाला रुक्मीणी पाणी देते. हिना पाणी पिते. आवंढा गिळते.

*हिनाः नंतर जाणवलं, नव्हत करायचं हे. त्या रागात केलं आपण. तूही डोक्यावर हे गिल्ट घेऊन कसा जगला असशील विचार केला पण उशीर झाला होता.*

*प्रतापः हिना मी तुला सिंपथी देऊ शकतो अभय नाही.*

*हिनाः माझी अपेक्षाही नाही.*

*प्रतापः सगळे जरा बाहेर जा. मला सत्याशी बोलायचंय.*

*रोहीतः एक मिनिट (पुढे येतो.) मॅडम, मी माफी मागून अनिरुध्दचा जीव परत येणार नाहीये पण मला माफ करा. आज मला पहिल्यांदा वाटतंय की मी त्या रात्री ती मुलं आणली नसती तर...*

*रुक्मीणीः (त्याच्याकडे पहात) तू मुलं आणली नसती तर, अनि प्रेमात पडला नसता तर, सत्या मत बदलायला निघाला नसता तर, त्यांना ती मत बदललीयेत हे कुणी सांगितलंच नसतं तर? (अमित एमजे कडे पहातो. तो मान खाली घालतो.) खूप गोष्टी आहेत. त्यानं स्वतःला वाचवायला हे सगळं केलं. आणि फक्त हात त्याचा होता पण त्याच्यामागे खूप लोकं होती. माझी गेलेली वर्ष आणि मुलगा दोन्ही परत येणार नाहीये हे माहीतेय . आणि तुम्ही कुणीही हे मुददाम नव्हतं केलं हे ही माहीतेय. आता कुणावरही रागवायचं माझं वय नाही आणि तुम्ही आधीचं सगळं मागे टाकून एकत्र आलात तरी अनिला अजूनही बरंच वाटेल.*

सत्याच्या डोळयातनं पाणी येतंय. मॅडमचा हात हातात घेऊन तो रोहीतकडे पहातो. रोहीत मान डोलावतो. सगळे एकेक करत बाहेर पडतात. आता त्या खोलीत फक्त सत्या प्रताप आणि रोहीत आहेत.

*प्रतापः मी सिनीयर पीआय प्रताप डोणजे पाटील, तुम्हाला विचारतोय काल रात्री काय झालं?*

*सत्याः बॅलन्स गेला माझा, तोल जाऊन पडलो टाकीवरुन.*

*प्रतापः (हलके हसतो.) वेल डन. तू होतास कुठे इतके दिवस?*

*सत्याः फिरत होतो. गाव बदलत. पण नशीब बदलत नव्हतं. गेली दोन वर्ष माझ्याच अनाथाश्रमात नोकरी करत होतो.*

*प्रतापः आणि ती सुसाईड नोट?*

*सत्याः लिहून ठेवली होती. रोज नव्यानी प्लॅन करायचो जीव दयायचा. पण धाडसच नाही झालं.*

*प्रतापः आता करुही नकोस. आता डिस्चार्ज घ्या पटकन . आणि आम्हालाही दया.*

हात पुढे करतो. सत्या हातात हात देतो.

## 62. Ext/ Hostel Corridor/ Day

**NEXT DAY** दुपार. सगळे जण पुन्हा एकदा हॉस्टेलच्या हॉलमध्ये जमलेत. सत्याच्या डोक्याला बँडेज. खांदा प्लॅस्टर मध्ये. स्टीक घेऊन चालतोय. सगळे जमतात.

*रुक्मीणीः तुम्ही काळजी घ्या सगळे. आणि दरवर्षी या. म्हणजे या दिवसाच्या तयारीसाठी मी उरलेले तीनशे चौसष्ट दिवस जगू शकीन.*

सगळे निघायला लागतात. रोहीत सत्याला टॅप करतो.

*रोहीतः सत्या, जवानांना मदत हवी असेल तर कधीही सांग.*

*सत्याः येस.*

दोघं शेकहँड करतात. एक मोमेंट जाते. मग मिठी मारतात.

*अमितः निघूया?*

*सत्याः अं हं! आधी अप्पू... मला भेटणारेस का नाही नीट?*

*(हात पुढे करतो. ती हेलावून मिठी मारते. अमित पहातो.)*

*सत्याः नवरा बघतोय तुझा पण त्याच्यासमोरच सांगतो. मला कधीच तुझ्या प्रेमाला नीट रिस्पॉन्स देता आला नाही. जेव्हा तुला तो हवा होता तेव्हाच मी निघून गेलो. मनापासनं सॉरी.*

*अप्पूः आपलं नातं प्रेम आणि सॉरी दोन्ही पलिकडचं आहे. तू खुश रहा बस.*

*सत्याः हो आणि ते व्हॅनिला आईस्क्रीम खायला जायचं राहीलयं.*

*अप्पूः ते जाऊच. फक्त या पुढे फोनवर तू कसा आहेस विचारलं की उत्तर दे.*

*सत्याः (उर्वशीकडे पहात) आता माझ्याकडे उत्तर आहे.*

ते पाहून अप्पू स्वतःहून सोडवते. उर्वशीकडे हसून पहाते.उर्वशी सुध्दा रिस्पॉन्ड करते.

रोहीतः (उर्वशीकडे पहात) हॅपी?

उर्वशीः एकदम!! थँक्स!!

*जसपिंदरः आप साब लोग अभी हमारे घर आओ खाना खाने के लिये! क्यों घाटट?*

सगळे हसतात. घटट डोक्याला हात मारतो.

62A. Ext/ Hostel Corridor/ Day

एका बाजूला टाकेश, प्रताप, बन्या बापू एकत्र उभे.

*टाकेशः एवढं सगळं मस्त झालं? काय हाय का नाही मंग?*

*प्रतापः काहीतरी मिसींग आहे मामा, नाही?*

*बापूः पोलिसवाल्यांना सगळंच मिसींग वाटतं. काय बन्या?*

*बन्याः हां मंग? (समोरुन एक फॉरेनर बाई आणि माणूस चालत येतात.) आयला फॉरेनर नी आडमिशन घेतली का काय? नायतर मॅडम असायच्या नवीन, फॉरेन लेग्वेज डिपार्टमेंटच्या.*

*स्लोः ऐ हाय! आजच आहे ना म्युझिकडिपार्टमेंटचं उदघाटन?*

*सगळे एकत्र : काल झाल स्लो!*

सगळे हसतात. त्याला जवळ घेऊन त्याच्यावर पडी घेतात. फॉरेनर गोंधळते. सगळे हसत हसत कॉरीडॉर मधनं बाहेर येतात. एकमेकांना कडकडून मिठी मारतात. खूश आहेत. जणू आधीचं सगळं विसरुन गेलेत. एवढयात गिटारचं स्ट्रमिंग ऐकू येतं. प्रत्येक जण वळून वर पहातो. अवाक होताना दिसतो. कॅमेरा त्याच शॉटमध्ये वर वर जातो. गच्चीवर पुढे हातात तारामती घेऊन अनिरुध्द बसलेला दिसतो. तो पुन्हा एकदा गिटारची तार छेडतो तसे त्याच फ्रेम मध्ये एकामागून एक १९९५ चे, सत्या उर्वशी रोहीत अप्पू हिना अमित ससा घटट स्लो एम जे असे सगळे पळत पळत येतात. गच्चीवर एकत्र उभे रहातात. हसून खालच्या सगळयांना हात करतात. त्यांचे चेहरे आनंदाने फुललेले. त्या जुन्या हसणाऱ्या जुन्या क्लासमेटसवरच सिनेमाचा शेवट होतो.

******** THE END *******

**क्षितिज पटवर्धन**

**१२ एप्रिल २०१४ सायंकाळी ६ वाजून ५६ मिनिटे.**